१ एप्रिल १९६७

चाळीस पैसे




# हम मर रहे है सरकार!

ज्वलंत राष्ट्रवादाच्या

भयानक दीप्तीचा

ललितभव्य आलेख

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य पंचवीस रुपये

'माणूस' मधून प्रसिद्ध झालेल्या

प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती

राजहंस प्रकाशन,

४१९ नारायण पेठ, पुणे २.




## एक समग्र साप्ताहिक


*वर्ष : सहावे*
*अंक : एकूणचाळीसावा*
*किंमत : चाळीस पैसे*
*वार्षिक वर्गणी : वीस रुपये*

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
*अ. मा. साधू*
*दिलीप माजगावकर*
*सौ. निर्मला पुरंदरे*

**व्यवस्था विभाग**
*अ. वा. गंधे*
*अ. वि. गणपत्ये*

*पत्ता – ४९१ नारायण, पुणे २.*
*दूरध्वनी – ५७४५१*


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.



# पत्र-मैत्री

**स. न.** **मार्च १३**

ता. ११ च्या आपल्या अंकातील 'व्हिएटनामच्या युद्धभूमीवर' हा लेख फार आवडला. म्हणतात युद्धस्य कथा रम्य: तद्वत हा लेख वाचून व्हिएटनामचे रणक्षेत्र डोळ्यांसमोर तरळू लागले. ती हेलिकॉप्टर्स, ती बॉंबफेक, सैनिकांची कूच...या सर्वांचा चित्रपट घेणारी कथा जशी या लेखात सांगितली तसा तो घेतलेला चित्रपटच डोळ्यासमोर येथे साकार होतो. 'आस्वाद 'सारखे सदर श्री. गोपीनाथ तळवलकरांसारख्या सिद्धहस्त साहित्यिकाकडे असल्याने ते 'माणूस' चे खास आकर्षण राहील. चित्रपट-परीक्षणे मार्मिक आहेत.

**सु. द. भडभडे, कोल्हापूर.**

**स. न.** **मार्च १८**

१८ मार्चच्या 'माणूस' मधील श्री. पेठकर यांचा कै. स. गो. बर्वे यांच्यावरील लेख औचित्यपूर्ण वाटला. 'आणि ड्रॅगन जागा झाला' ही अरुण साधू यांची लेखमाला खूपच नि:पक्षपातीपणे लिहिल्यामुळे आकर्षक वाटते. 'खास-वार्तापत्रांत' बिहारवरील लेखामुळे तेथील दुष्काळाची भीषण सत्यता प्रत्ययास आली. चित्रपट परीक्षणही समाधानकारक असते. मुंबईतील निवडणुकांबाबतचे आपले अंदाज दुर्दैवाने सपशेल चुकीचे ठरले.


आजकाल 'माणूस' मुखपृष्ठाची सजावट पूर्वीएवढी आकर्षक व डौलदार होत नाही.

**माधव स. रानडे, मुंबई**

# दुखण्यांनी मंत्रिमंडळ बेजार !

१९६७ हे वर्ष काँग्रेस पक्षाला काही चांगले दिसत नाही. वीस वर्षांपूर्वी काँग्रेसने सत्तास्वीकार केला, तेव्हापासून प्रत्येक निवडणुकीत काँग्रेसला एवढे अमाप यश मिळाले की, इतर पक्षांचे अस्तित्व नाममात्रच होते; परंतु महिन्याभरापूर्वीच पार पडलेल्या निवडणुकीत काँग्रेसची एवढी नामुष्की झाली की तिची पूर्वीची प्रतिमा पार विसकटून गेली आहे. पंधराएक दिवसांपूर्वी श्रीमती इंदिरा गांधी यांच्या नव्या मंत्रिमंडळाने अधिकारस्वीकार केल्यापासून असा एकही दिवस गेला नाही की, ज्या दिवशी कोणताही नवा प्रश्न पुढे आला नाही.

या समस्यांना सुरुवात झाली ती राजस्थानपासून. नव्या मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत राजस्थानमध्ये राष्ट्रपतींचे शासन जारी करण्याचा निर्णय करावा लागला. कोणत्याही प्रश्नाचा सर्वांगीण विचार करून तो सोडविण्यासाठी दीर्घकालीन स्वरूपाची उपाययोजना करण्याचे काँग्रेसश्रेष्ठांच्या स्वभावातच नव्हते. सारा भार तात्पुरत्या मलमपट्टीवर. इंदिरा गांधी यांचे नवे मंत्रिमंडळही त्याला अपवाद नाही. वस्तुतः राजस्थानमध्ये निर्विवाद बहुमत मिळाले नसताना तेथे सरकार बनविण्याची घाई करावयाचे काँग्रेसश्रेष्ठांना काहीच कारण नव्हते. तसे त्यांनी निवडणुकीचे निकाल जाहीर होताच सांगितलेही होते ! परंतु आपण मंत्रिमंडळ बनवू शकू, असा सुखाडिया यांनी दावा करताच राज्यपाल डॉ. संपूर्णानंद काय किंवा कामराज प्रभृति काँग्रेसश्रेष्ठ काय, दोघांनीही त्यांना मंत्रिमंडळ बनविण्याचा आदेश दिला. परंतु जयपूरमधल्या प्रखर जनविरोधाचे दर्शन घडताच सुखाडिया यांचे अवसान गळाले व त्यांचा राजकीय आजार बळावला. या 'आजारा'तून उठताच त्यांनी आपण प्रक्षुब्ध परिस्थितीमुळे मंत्रिमंडळ बनविण्यास असमर्थ आहोत असे जाहीर केले. अशा वेळी संयुक्त आघाडीचे नेते महारावळ लक्ष्मणसिंग यांना मंत्रिमंडळ बनविण्यास पाचारण करणे राज्यपालांचे कर्तव्य होते. परंतु त्याऐवजी त्यांनी राष्ट्रपतींचे शासन



जारी करावे, असे आपले मत असल्याचे केंद्रीय सरकारला कळविले. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या या निर्णयानंतर संयुक्त आघाडीचे ९३ सदस्य मुद्दाम दिल्लीला आले व आपल्या निर्विवाद बहुमताचा राष्ट्रपतींकडे आणि गृहमंत्र्यांकडे प्रत्यक्ष पुरावाच सादर केला; परंतु केंद्र सरकारने आता हा आपल्या प्रतिष्ठेचा विषय केला असून आणखी महिनाभर तरी आपल्या निर्णयाला चिकटून राहण्याचे ठरविले आहे. एकदा पहिला निर्णय पक्षीय प्रतिष्ठेच्या दृष्टिकोनातून घेतल्यानंतर त्यामागोमाग केले जाणारे निर्णयही लोकमताचा कौल डावलण्याचे धाष्टर्य कसे दाखवितात याचे राजस्थान हे बोलके उदाहरण आहे.

## काँग्रेसचा हट्ट अंगाशी येणार

परंतु काँग्रेसश्रेष्ठांच्या या आठमुड्या धोरणाचा परिणाम असा झाला की संयुक्त आघाडीची एकजूट अधिकच बळकट झाली व जे अपक्षीय सदस्य दोलायमान, मन:स्थितीत होते त्यांनी आपली ही अनिश्चित अवस्था सोडून संयुक्त आघाडीचे बाजूने ठामपणे उभे राहण्याचे ठरविले. संयुक्त आघाडीचे नेते महारावळ लक्ष्मणसिंग यांच्याशी बोलण्याची मला संधी लाभली होती. "राष्ट्रपतींचे शासन जारी करून केंद्रीय मंत्रिमंडळाने राजस्थानमधील जनतेचा उपमर्द केला आहे," या शब्दांत त्यांनी आपली नापसंती व्यक्त केली. महारावळ हेही राजस्थानच्या राजकारणातील मुरब्बी व्यक्ती म्हणून ओळखले जातात. आतापर्यंत सुखाडिया जे तंत्र वापरीत होते, ते तंत्र महारावळांनाही सुपरिचित आहे. ज्या उद्योगपतींच्या आणि जमीनदारांच्या बळावर सुखाडिया अधिकारपद उपभोगीत होते त्या उद्योगपतींनी व जमीनदारांनी आता महारावळ यांच्या पाठीशी उभे राहण्याचे ठरविले आहे. जसा या उद्योगपतींचा व जमीनदारांचा महारावळ यांच्या स्वतंत्र पक्षाला पाठिंबा आहे तसाच मध्यमवर्गीय बुद्धिजीवी वर्गाचा पाठिंबा जन-

संघाच्या बाजूने उभा आहे. स्वतंत्र पक्ष आणि जनसंघ या दोन्ही शक्ती एकत्र आल्यामुळे आपल्या काही मूठभर हस्तकांव्यतिरिक्त सुखाडिया यांच्या बाजूने उभे राहण्यास कोणीही तयार नाही. या सर्व परिस्थितीच्या संदर्भात बोलताना महारावळ म्हणाले की, "बंगालमधील अतुल्य घोष यांची किंवा मुंबईतील स. का. पाटील यांची मिरासदारी जशी तेथील जनतेने उखडून टाकली आहे, तसेच आम्ही राजस्थान-पुरते सुखाडिया यांचे नेतृत्व निष्प्रभ करून टाकले आहे! परंतु ही वस्तुस्थिती ध्यानात येऊनसुद्धा ती नाकारण्याचा हट्ट कॉंग्रेसश्रेष्ठ का दाखवीत आहेत, हेच समजत नाही. एवढा मोठा देशव्यापी पराभव झाल्यानंतरही शहाणपणा शिकण्याची कॉंग्रेसश्रेष्ठांची मानसिक तयारी दिसत नाही. त्यांचे हे हट्टी वर्तन कायम राहिले तर राजाजी म्हणतात त्याप्रमाणे दीड वर्षाच्या आत दिल्लीतील कॉंग्रेस मंत्रि-मंडळावर फेरनिवडणुका घेण्याची पाळी येईल व ती निवडणूक कॉंग्रेसच्या दृष्टीने तरी अखेरची ठरेल."

महारावळ एवढे चिडून का बोलतात हे जाणून घ्यावयाचे असेल तर त्यासाठी राजस्थानमधून निवडून आलेल्या कॉंग्रेस खासदारांनाच भेटावयास हवे. त्यांच्यांतील एकही जण सुखाडिया यांच्यासंबंधी भला शब्द उच्चारीत नाही. या कॉंग्रेसपक्षीय खासदारांनीही राजस्थानमध्ये राष्ट्रपतींचे शासन जारी करण्याच्या निर्णयाचा निषेध केला आहे. कारण या शासनामुळे जनतेचा असंतोष अधिकच भडकेल व यापुढील निवडणुकी जिंकणे आपल्याला कठिण जाईल, असे हे खासदार म्हणत आहेत.

## शर्मांची उचलबांगडी

केंद्र सरकार राजस्थानचे दुखणे निस्तरते आहे तोच हरियानातील तेरा कॉंग्रेस-जनांनी तेथील मुख्यमंत्री श्री. भागवत दयाल शर्मा यांच्याविरुद्ध बंडाचा झेंडा उभा-रला आहे. या बंडखोर कॉंग्रेसजनांचे नेते मूळचंद जैन व प्रतापसिंग दौलता मध्यं-तरी दिल्लीला येऊन गेले. या बंडखोरांचा विरोध आहे तो भागवत दयाल शर्मा यांच्या नेतृत्वाला. कॉंग्रेसश्रेष्ठांनी लादलेला हा नेता झुगारून देण्याचा मूळचंद जैन प्रभृतींचा निर्धार आहे. आजची परिस्थिती अशी आहे की कदाचित जैन-दौलता प्रभृति मंडळी अतिरेकी भूमिका स्वीकारणार नाहीत; परंतु भागवत दयाल शर्मा यांना मुख्यमंत्रिपदावरून दूर केल्याशिवाय हरियाना कॉंग्रेसला शांतता लाभणार नाही, ही गोष्ट निर्विवाद आहे. परंतु भागवत दयाल शर्मा यांना नेतेपदावरून दूर केले तर त्यांचा जो गट आहे तो नव्या नेत्याविरुद्ध बंडाचा झेंडा उभारण्याची शक्यता आहे! अशा परिस्थितीत हरियानामध्ये स्थिर सरकार कसे निर्माण करावे हा भुंगा कामराज–इंदिरा गांधी–चव्हाण प्रभृतींना सतावत आहे.

चंदिगडमध्ये शेजारीच गुरुनामसिंग यांचे संयुक्त आघाडीचे मंत्रिमंडळ मोठ्या तडफेने कामास लागलेले आहे. गुरुनामसिंग पूर्वी हायकोर्टाचे न्यायधीश होते.

त्यांच्यासारखा सर्व पक्षांना मान्य होणारा न्यायनिष्ठुर गृहस्थ पंजाबचे नेतृत्व मोठ्या हिंमतीने करीत असताना हरियानातील काँग्रेस मंत्रिमंडळांतर्गत गटबाजीने पुरे पोखरून गेले आहे. साहजिकच हरियानामधील जनता एकाच शहरात काम करीत असलेल्या या दोन मंत्रिमंडळांच्या कार्यपद्धतीची तुलना करीत आहे. चंदीगडची डोकेदुखी लवकर संपणार नाही. जुन्या पंजाबच्या विभाजनातून ती निर्माण झालेली आहे.

उत्तर सीमेवर अशा कटकटी चालू असताना आग्नेय भारतातील पाँडिचेरीनेही बंडाचा झेंडा उभारला आहे. खरे म्हणजे फ्रेंचांनी पाँडिचेरीवरील ताबा सोडल्यानंतर हा चिमुकला प्रदेश मद्रास राज्यात विलीन करणे शहाणपणाचे ठरले असते. परंतु स्वतंत्र फ्रेंच संस्कृतीचे रक्षण करण्याच्या उदात्त नावखाली आणखी एक वेगळे सत्ताकेंद्र अबाधित ठेवण्याचा त्यामागचा कावा होता ! जोपर्यंत मद्रासमध्ये काँग्रेस मंत्रिमंडळ होते तोपर्यंत ही कारवाई त्रासदायक झाली नव्हती. परंतु पाँडिचेरीच्या भोवती पसरलेल्या मद्रास राज्यात कळघमचे सरकार अधिकारावर आल्यानंतर चिमुकल्या पाँडिचेरीतील काँग्रेस मंत्रिमंडळावर त्याचा परिणाम होणे अगदी साहजिक होते. पाँडिचेरी येथील व्यंकटसुबय्या रेड्डियार यांच्या मंत्रिमंडळात एकूण चार मंत्री होते व त्यांपैकी दोघांनी पक्षत्याग करताच रेड्डियार यांना आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा सादर करणे भाग पडले.

## पर्यायी पक्षाचा अभाव

ही सर्व परिस्थिती लक्षात घेतल्यावर काँग्रेस संघटना हळूहळू विस्कळीत होऊ लागल्याचे दृश्य सर्वत्र दिसत असून तिला आवर घालणारा समर्थ नेता त्या पक्षाजवळ नाही. निवडणुकीतील पराभवानंतर कामराज यांची प्रतिष्ठाही बरीच कमी झाली आहे. पूर्वी त्यांना मुलाखती देण्याचा मोठा हव्यास असे. परंतु आता ' ४, जंतरमंतर रोड ' या त्यांच्या निवासस्थानी कोणी पत्रकार गेला तर प्रश्नांना उत्तरे देण्यास टाळाटाळ करणारे आणि त्रासिक चेहऱ्याने वावरणारे कामराज पाहावयास मिळतात. पूर्वी ' पार्कलाम ' (पुढे बघू) हे त्यांचे उत्तर कायम असे. आता मात्र पुढे बघण्यासारखेच काहीही उरलेले नसल्यामुळे काँग्रेसची घसरगुंडी पाहण्याशिवाय त्यांना गत्यंतरच राहिलेले नाही. १९६७ हे वर्ष काँग्रेसच्या दृष्टीने चांगल्या रीतीने सुरू झालेले नाही. काँग्रेसचा यापुढचा प्रवासही मोठा आशादायी ठरेल असे दिसत नाही; परंतु काँग्रेसची जागा घेऊ शकेल, असा पर्यायी पक्ष नजरेच्या टप्प्यात अद्याप तरी येत नाही, हीच खरी चिंतेची बाब आहे.

— सदाशिव पेठकर

●

# मुक्ताफळे



## ☐ नियम काही नाही !

समस्त सरकारी कारभारातील दप्तर दिरंगाई नष्ट करण्याची घोषणा राजारामबापू पाटील यांनी केली आहे. यापुढे सरकारी कारभारात जर कुणी कागद दाबून ठेवले तर त्या अधिकाऱ्याची व कारकुनाची गय केली जाणार नाही, असा इशारा राजारामबापूंनी दिला आहे. वस्तुत: सरकारच्या कारभारात दिरंगाई औषधालाही नसताना, मंत्रिमहाशयांनी ही नवी घोषणा करावी, हा केवळ त्यांचा ' विनय ' आहे. आमचे म्हणणे स्पष्ट करण्यासाठी आम्ही प्रथम ' दप्तर ' व ' दिरंगाई ' यांसंबंधी असलेली वस्तुस्थिती नमूद करतो.

समजा, विठ्ठल नामदेव गोमकाळे याने १ एप्रिल रोजी सरकारी दप्तरात, आपल्या उसाला पाणी मिळावे म्हणून एक अर्ज केला. श्रीयुत गोमकाळे यांनी गेली तीन वर्षे सरकारी पाणीपट्टी भरलेली नाही, त्यांचेकडे सुमारे हजार रुपये थकबाकीही आहे. ही थकबाकी भरण्याची श्री. गोमकाळे यांची इच्छा होती, परंतु गतवर्षी त्यांनी दोन मोटरसायकली व धंद्यासाठी एक ट्रक घेतल्यामुळे पैशाची जरा ओढाताण झाली व सरकारी देणे त्यांनी दिले नाही. सरकार हे जनतेचे असल्यामुळे, त्यांना सरकारची पाणीपट्टी तशीच अंगावर ठेवण्याचा संपूर्ण अधिकार आहे; कारण गोमकाळे हे जनतेतील एक आहेत. सरकारची लाखो रुपये थकबाकी असताना त्यात हजार-बाराशेंनी काय होते आहे, असे त्यांचे खाजगी म्हणणे आहे व ते केव्हाही रास्त आहे !

एक एप्रिलला लिहिलेला हा अर्ज खिशात ठेवून ते आपल्या भागातील आमदारांना भेटण्याची संधी पाहत आहेत. दोन-तीन दिवस आमदार भेटू शकले नाहीत, तेव्हा कंटाळून त्यांनी अर्ज पोस्टात टाकला. ४ एप्रिलला पोस्टात पडलेला अर्ज ६ एप्रिलला सकाळी सरकारी दप्तरात हेडक्लार्कसाहेबांच्या टेबलावर आला.

अर्ज वाचून त्यावर मुद्रा करून, हेडक्लार्कसाहेबांनी अर्ज साहेबांच्या टपालात

त्यांच्या अवलोकनार्थ ठेवला. साहेब बाहेर फिरतीवर गेले होते ते ९ एप्रिलला परत आले व त्या दिवशी साहेबांची मुद्रा त्यावर झाली. मध्यंतरीच्या काळात कार्यालयातील दोन-तीन कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या मुद्रा त्यावर झाल्या होत्या.

आवक नोंदणारी कारकून कुमारी कुरकुरे यांनी वस्तुत: तो अर्ज १० एप्रिलला नोंदवावयाचा; परंतु त्यांना 'पाहण्यासाठी' घरी माणसे येणार असल्याने त्या किरकोळ रजेवर होत्या. नापसंत ठरून ११ एप्रिलला त्या कामावर आल्यावर त्यांनी अर्ज नोंदवला ... व तो अर्ज ज्यांचेकडे पुढील कारवाईसाठी धाडावयाचा त्या उपखात्याचे नाव घेऊन त्यांनी राणू शिपायाला तो अर्ज दिला.

उपखात्यात पुन्हा नोंद झाल्यावर वस्तुत: तो अर्ज खोटे कारकुनाकडे त्याच दवशी जायचा. परंतु खोटे कारकून पत्नीच्या दम्यामुळे दोन दिवस स्वयंपाकासाठी किरकोळ रजेवर होते. पत्नीचा दमा थोडा शमल्यावर १३ एप्रिलला ते आले तेव्हा त्यांना तो अर्ज मिळाला.

कुठलाही कागद हाती आला की निदान ७ दिवसांत त्यावर क्रिया करावयाची, असा नियम असल्याने २० एप्रिलपर्यंत त्याबाबत खोटे यांना काहीही कर्तव्य नव्हते ! त्यांनी तो अर्ज–हा जणू राणूचा उपद्व्याप आहे, अशा मुद्रेने दप्तरी दाखल केला.

२० एप्रिलला खोटे यांनी सकाळी गोमकाळे यांचा अर्ज वाचला. नियमानुसार थकबाकी चुकती केल्याशिवाय पाणी देण्याचे नसल्याने त्यांनी त्या पत्रावर—

"अर्जदाराची सुमारे एक हजार थकबाकी असल्याने पाणी देता येत नाही. थकबाकीचा भरणा करावा" अशा अर्थाचे पत्र लिहून कागद हेडक्लार्कसाहेबांचे टोपलीत टाकला. खोटे हे वयोमानाप्रमाणे अधिक अधिक गलथान झालेले आहेत, याबद्दल हेडक्लार्कसाहेबांची खात्री असल्याने "थकबाकीचा आकडा का लिहिला नाही ?" असा शेरा खाऊन तो गोमकाळे यांचा अर्ज २१ एप्रिलला सकाळी पुनश्च खोटे यांच्या टेबलावर आला. खुर्चीतून उठून आता रजिस्टरामधून थकबाकीचा नक्की आकडा काढावा लागणार या कल्पनेने व्यथित झालेले खोटे २२ एप्रिलला सकाळी रजिस्टर शोधू लागले. कार्यालयात रजिस्टरे ठेवायला कपाटे वगैरे नसल्याने कुठले रजिस्टर कुठेही मिळू शकते ! अर्थात् खोटे यांनी शिपायाच्या मदतीने रजिस्टर शोधायला कसून सुरुवात केली. तपासात रजिस्टर गेल्या महिन्यात साहेबांकडे गेलेले होते ते पुन्हा कुणीही पाहिलेले नाही असे नक्की झाले. २३, २४, २५, २६ या चारही दिवशी आठवण होताच खोटे रजिस्टरचा शोध करीत असत. आश्चर्य म्हणजे अनेक वेळा तक्रार करूनही खुर्चीचा फाटका वेत दुरुस्त न झाल्याने, देशपांडे सरकारकून हे त्या रजिस्टरवर गेल्या महिनाभर बसले होते असे लक्षात आले. यामुळे अक्षरश: श्री. देशपांडे यांच्या मांडीखालून ते रजिस्टर खोटे यांनी पैदा केले.

२७ एप्रिल उजाडला होता. रजिस्टरमध्ये पाच-सहा गोमकाळचांपुढे निरनिराळ्या

थकबाक्यांचे आकडे होते. यातील अर्जदार गोमकाळे कोणते हे खोटे यांना नक्की करता येईना. अखेर पूर्वीचा विठू नामा म्हणजेच विठ्ठलराव नामदेवराव गोमकाळे असे जुन्या जीर्ण रजिस्टरवरून अनुमान काढून खोटे यांनी विठ्ठलराव नामदेवांची थकबाकी रु. ९१४ नक्की केली.

२८ एप्रिलला हेडक्लार्कसाहेबांची उपमुद्रा होऊन ही नकारघंटा त्वरित साहेबांच्या खोलीपर्यंत वाजली.

आता एक-दोन दिवसांत गोमकाळे यांना आपल्या अर्जाचा निकाल लागणार हे कळणारच होते; परंतु "पाणी मिळत नाही–" ही गोष्ट गोमकाळे यांना तर्काने कळलेली असल्याने ते मुंबईला खात्याच्या मंत्र्यांना भेटण्यासाठी आपल्या भागातील आमदारासह रवाना झाले होते.

गोमकाळे यांच्या पत्राला नकार दिलेल्या पत्रावर साहेब मुद्रा करणार तोच त्यांचा फोन घणघणला.

"जनतेला आपण त्रास देता. गोमकाळे यांना पाणी द्यायला हवे. पाणी दिले नाहीतर पिके कशी येणार ? उद्या वृत्तपत्रात तक्रार झाली तर मंत्री काय सांगणार ? पाणी ताबडतोब द्यावे–"

अशी तंबी साहेबांना त्यांच्या वरिष्ठ साहेबाकडून फोनवर मिळाली. तंबी मुंबई-हून आलेली होती व खाली खाली ढकलण्यात आली होती.

२९ एप्रिलला सायंकाळी खोटे कारकून व साहेब यांच्यांत संवाद सुरू झाला––

"खोटे थकबाकी असली तर आपण पाणी देतो का ?"

"नाही साहेब, तसा नियमच आहे."

"नियम असू द्याहो ! आपण देऊ शकतो की नाही ?"

"देऊ शकतो साहेब; तशी कारणे असावी लागतात."

"मग या गोमकाळेला का देत नाही– ?"

"त्याची थकबाकी आहे साहेब ९१४ रुपये. रजिस्टरात नोंद आहे तशी. रजिस्टरावर देशपांडे बसले होते म्हणून ते सापडत नव्हते–"

"कोण बसले होते ?"

"नाही. ते आपलं सहज सांगितलं. रजिस्टर आता सापडलंय साहेब !"

"खोटे तुम्ही काहीतरी वायफळ बोलत राहता. टू दि पॉइंट बोला. म्हणजे याला पाणी देता येईल–"

"कारणे दिली पाहिजेत तशी !"

"मग गोमकाळचांना पत्र लिहून बोलावून घ्या. थोरजनतेपैकी ते एक थोरजन आहेत. आणि ते आले, तरी थकबाकीचा विषय काढू नका !–"

कागद घेऊन जवळ जवळ भोवळ आलेले खोटे बाहेर आले. पत्र गेले. गोमकाळे आले. कारणे तयार झाली. साहेब पुन्हा फिरतीवरून परत आले व १५ मेला पाणी

देण्याची व्यवस्था होत आहे, असे बदामी पत्र गोमकाळे यांच्या हातांत पडले. शेतकरी आनंदित झाला !

आता यात दप्तर दिरंगाई आहे का ? गोऱ्या साहेबाने पाणीपट्टी भरली तरच पाणी द्यावे, असे काही ' जाचक ' नियम पूर्वीपासून तयार केले आहेत. यामुळे सरकारी दप्तरात रजिस्टरे निर्माण झाली व दप्तर दिरंगाई सुरू झाली. जर हे नियम व रजिस्टरेच नाहीशी केली तर दिरंगाई औषधालाही राहणार नाही.

याचबरोबर जनतेने मंत्रिभक्ती करावयाची व मंत्र्याने सेवा ! समर्थांनी नवविधा भक्तीची लक्षणे सांगितली आहेत. आता मराठी माणसांनी आणखी एक दहावी भक्ती शिकली पाहिजे. या भक्तीने दप्तर दिरंगाईचा त्रास होत नाही. या भक्तीची लक्षणे अशी —

मागां आले निरुपण । नवमी भक्तीचे लक्षण ।
आता ऐका सावधान । दशमी भक्ती ।। १ ।।
मंत्र्यासी परमसख्य करावे । प्रेमप्रीतीने बांधावे ।
दशमी भक्तीचे । लक्षण ऐसे ।। २ ।।
मंत्र्याच्या सख्यत्वासाठी । पडाव्या जिवलगांच्या तुटी ।
सर्व अर्पावे सेवटी । ' मत ' तेही वेचावे ।। ३ ।।
ऐसे परम सख्य धरिता । मंत्र्यासी लागे भक्ताची चिंता ।
अधिकारी सरकारी जळता । विवरद्वारे काढिले ।। ४ ।।
मंत्र्यास जयाची अत्यंत प्रीती । आपण वर्तावे तेणे रिती ।
येणे करता मंत्री । सख्य घडे नेमस्त ।। ५ ।।
वचने बोलावी करुणेची । नाना प्रकारे स्तुतीची ।
अंतर निवती सकळांची । ऐसे वदावे ।। ६ ।।
दप्तरी नियम काही नाही । म्हणून मंत्र्यास म्हणावी अंगाई ।
तेणे दप्तर दिरंगाई । ठरे नासाडी शाईची ।। ७ ।।

या दशमी भक्तीचा प्रभाव योग्य आकलन न झाल्याने तो कमी करावा, असा सल्ला राजगोपालाचारी यांनी श्री. अन्नादुराई यांना मद्रासमध्ये दिला आहे.

चक्रवर्तीचे म्हणणे " सेक्रेटरीएटच्या व्हरांड्यातून आमदारांना हाकलून काढा. "

अशा तऱ्हेचे काही महाराष्ट्र सरकार करणार नाही हे आपले भाग्य होय. कारण दप्तर दिरंगाई नष्ट करण्याचा आता सरकारचा निर्धार आहे. 'दप्तरी नियम काही नाही । तेणे दप्तर दिरंगाई ।। ' ही गोष्ट ओळखून नवी सेवापरायण सरकारी नियमांची पुस्तके खातेवार तयार केली व जाचक नियम काढून टाकले तर जनतेत आनंदीआनंद निर्माण होईल. थकबाकी राहिली तर सरकारने पाणी देऊ नये, तगाई परत करावी, हे काय नियम आहेत !

—ग्यानबा

●

## ☐ वृत्तपत्र–व्यवसायातील प्रचलित गैरसमज

वृत्तपत्रांचा बादशहा नुकताच भारत–भेट देऊन गेला. तो म्हणजे इग्लंड, अमेरिका, कॅनडा अशा निरनिराळ्या देशांतल्या एकूण १३६ वर्तमानपत्रांचे मालक लॉर्ड रॉय टॉमसन. दिल्लीत पत्रकारांशी बालताना त्यांनी वत्तपत्र–व्यवसायातील काही प्रचलित गरसमज स्पष्ट केले ते असे.

संपादक हा वर्तमानपत्रातला एक श्रेष्ठ माणूस समजला जाता; पण तो तसा नाही. संपादकीय मताच्या तत्त्वापेक्षा आणखी एक तत्त्व अधिक महत्त्वाचे आहे, व ते म्हणजे उपलब्धतेचे तत्त्व. समजा, ५०,००० प्रतींचा खप असणाऱ्या एखाद्या वर्तमानपत्राच्या संपादकाने एकदम ठरवले की ५० परदेशी वार्ताहर नेमायचे–पैसा कोठून येणार ? तुमच्याजवळ जेवढा पैसा असेल तेवढाच तुम्ही खर्च करू शकणार आणि ज्या गोष्टींमुळे वर्तमानपत्र चालविणे इतर आधुनिक उद्योग-धंद्यांप्रमाणेच एक व्यवसाय झाला आहे त्या उत्पन्न, हिशेब, ऑडिट वगैरे शेकडो गोष्टींची कल्पना संपादकाला आपल्या खोलीत बसून कशी येणार ? हल्लीचे वर्तमानपत्र असे व्यावसायिक पद्धतीने चालविले तरच चालू शकते. म्हणून आर्थिक-दृष्ट्या यशस्वी अशा वर्तमानपत्रात आता संपादक सर्वांत वरचा माणूस राहिलेला नाही. त्याने प्रबंध संपादकाच्या (मॅनेजिंग एडिटरच्या) खालोखाल दुय्यम स्थान स्वीकारले पाहिजे. आणि याचा अर्थ संपादकावर हुकूमशाही गाजविण्यात येते, असा होत नाही. " माझ्या वर्तमानपत्रांत काय छापले जाते हे मला माहीत नाही. मी ते हातांत घेतो ते फक्त जाहिराती मोजण्यासाठी ! "

वृत्तपत्रसृष्टीत प्रचलित असलेला आणखी एक गैरसमज म्हणजे टेलिव्हिजन व रेडिओपासून वर्तमानपत्रांस धोका आहे हा. कुठल्याही देशात ही कल्पना सिद्ध झालेली नाही. इंग्लंडमध्ये प्रत्येक घरात टेलिव्हिजन असूनही लंडन टाइम्सचा खप ७७,००० होता तो दहा लाखांच्यावर गेला आहे. सर्वसाधारण समजूत काहीही असली तरी टेलिव्हिजन किंवा रेडिओने नव्हे तर वर्तमानपत्रामुळेच एखाद्या घटनेशी आपला जवळचा संबंध आल्यासारखे वाटते.

पत्रकार मंडळींचे आणखी एक आवडते तत्त्व म्हणजे वृत्तव्यवसायासाठी शिक्षणाची गरज नाही, काम करून करून हा व्यवसाय शिकता येतो व जिल्हापत्रात सुरुवात केली की चढत चढत 'टाइम्स'पर्यंत मजल गाठता येते. ही कल्पना अगदी खोटी आहे. प्रत्येक व्यवसायाला शिक्षणाची आवश्यकता आहे. डॉक्टरला आहे, वकिलाला आहे, व्यवसाय करणाऱ्यालाही आहे. मग चूक करणे हे आवश्यक

आहे अशी पत्रकारांनी का श्रद्धा बाळगावी ? शिक्षणाचा प्रत्येकाला लाभ होतो. " मला थोडेसे प्रशिक्षण मिळाले असते तर मी ज्या चुका केल्या आहेत त्या केल्या नसत्या. " वृत्तव्यवसायाच्या वाढीसाठी व जबाबदार वृत्तपत्रीय लेखनासाठी वृत्त-व्यवसायाची महाविद्यालये आवश्यक आहेत. जबाबदार लेखनामुळे लेखक व त्याचा वाचक वर्ग यांच्यांत एक वैशिष्टयपूर्ण व महत्त्वाचे नाते निर्माण होते.

हे नाते निर्माण करावयाचे असेल तर एक मोठा नियम म्हणजे निनावीपणा सोडल ापाहिजे. निनावीपणाच्या या तत्त्वालाही पत्रकारांच्या परंपरेत अगदी धर्मा-सारखे महत्त्व प्राप्त झाले आहे. पण माणसाला स्वत:चे नाव वापरायची पर-वानगी मिळाली तर तो सर्वोत्कृष्ट काम करण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या लेखना-बरोबर त्याचा फोटो छापला तर त्याहूनही चांगले ! आपण ज्याचे लेखन वाचतो तो माणूस दिसायला कसा आहे हे वाचकांना समजले तर त्यात वाईट काय आहे ?

## □ वेड लागलेल्या जगात भारताची जबाबदारी

' शांततेवर संभाषण " ( डायलॉग ऑन् पीस ) नावाच्या एका अमेरिकन चर्चा मंडळाची प्रमुख सौ. लोला हिल नुकतीच हिंदुस्थानात येऊन गेली तेव्हा ' युद्ध व शांततेच्या समस्यांचे ज्ञान पसरविणे " हे या चर्चा मंडळाचे उद्दिष्ट असल्याचे तिने सांगितले, " मंडळाचे दुसरे उद्दिष्ट म्हणजे या समस्या सोडविण्या-साठी प्रयत्न करणाऱ्या निरनिराळ्या देशांतल्या मंडळींना एकत्र आणणे. अणु-शस्त्रांच्या शर्यतीत भारत अजून सापडला नसल्याने शांतता प्रस्थापित करण्याच्या कार्यात ता जगाला मार्गदर्शन करू शकेल. आम्हा बाकीच्या सर्व मंडळींना वेड लागले आहे; पण हिंदुस्थान अजूनही जगाच्या मनोवृत्तीला शहाणपणाच्या मार्गावर आणू शकेल." ●

### ' अणु–छत्री 'चा उपयोग किती ?

अणुशस्त्रांच्याच विषयावर दुसरे एक परदेशी मत दिल्लीला नुकतेच ऐकायला मिळाले ते गिसेल्हर वर्सिंग या प्रतिष्ठित पश्चिम जर्मन पत्र-पंडिताचे. त्यांनी म्हटले, " अमेरिकेने पश्चिम जर्मनीच्या रक्षणासाठी जी ' अणुछत्री ' दिली आहे, तिच्या उपयुक्ततेबद्दल आता बऱ्याच पश्चिम जर्मन मंडळींना शंका येऊ लागली आहे. सोव्हिएट प्रक्षेपणास्त्रांचे तळ पश्चिम जर्म-नीच्या इतके जवळ आहेत की अणुयुद्धाचा भडका पेटला तर त्याचा पहिला फटका पश्चिम जर्मनीला बसेल. एका अर्थी आम्हांला संरक्षण आहे; पण एका अर्थी आम्ही सर्वांत आधी खलास होऊ. अर्थात अणुशस्त्रांच्या प्रसाराला पश्चिम जर्मनीचा जोरदार विरोध आहे, हे ओघानेच आले. "

श्रीमंत राष्ट्रांनी चालविलेली
दरिद्री - अर्धविकसित राष्ट्रांची

# ' शास्त्रज्ञ-लूट '

जगप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञांची
स्फोटक निरीक्षणे

शाम तारे

प्रगतिशील राष्ट्रांना जास्तीत जास्त शास्त्रज्ञांची गरज असते, असं आपण नेहमी म्हणत असलो तरी शास्त्रज्ञांचा फार मोठा प्रवाह दरिद्री आणि अर्धविकसित राष्ट्रांकडून श्रीमंत राष्ट्रांकडे वाहतो आहे ही वस्तुस्थिती आहे.

या प्रश्नावरील आतापावेतो प्रसिद्ध होऊ न शकलेला संयुक्त राष्ट्रांचा अहवाल तर इतका बोलका असावा की, अहवालात नमूद केलेल्या अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स आणि खुद्द संयुक्त राष्ट्रांवरील शास्त्रज्ञ आकर्षित करून घेण्याच्या आरोपामुळेच हा अहवाल प्रसिद्ध होऊ शकला नाही, अशी रास्त शंका येणे स्वाभाविक आहे.

ह्या अहवालाची जन्मकथा फार मनोरंजक आहे आणि त्यातली हाती आलेली निरीक्षणे स्फोटक नि बोधप्रद....

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या खास निधी समितीने गेल्या वर्षी इराणमधील एक मान्यवर समाजशास्त्रज्ञ श्री. एहसान नाराघी (Shri Ehsan Naraghi) यांना या शास्त्रज्ञ-प्रवाहाच्या प्रश्नाबद्दल संशोधन करण्याकरिता अनुदान दिले होते.

श्री. नाराघी यांनी यंदा आपला अहवाल संघटनेला सादर केला असून, त्यातील निरीक्षणामुळे खुद्द संयुक्त राष्ट्रांच्या सभासदांची त्रेधा उडली आहे.

श्री. नाराघी यांच्या अहवालातील मुख्य निरीक्षणे ही अशी आहेत :

१ : एकीकडे अर्धविकसित राष्ट्रांत 'शांतिदूत' वगैरे पाठविण्याचा बहाणा करीत असतानाच बहुतांशी पाश्चिमात्त्य राष्ट्रे त्या त्या विशिष्ट देशांतील उच्च श्रेणीच्या शास्त्रज्ञांना विशेष प्रलोभने दाखवून स्वत:कडे ओढून घेत आहेत. वास्तविक या अर्धविकसित राष्ट्रांना या शास्त्रज्ञांची अत्यंत आवश्यकता आहे.

२ : खुद्द संयुक्त राष्ट्रसंघ आणि संलग्न संस्था यांमध्ये अशा अर्धविकसित राष्ट्रांतून आलेल्या प्रशिक्षित 'निर्वासितांची' झुंबड उठलेली आढळून येते आणि हे निर्वासितदेखील आराम, जास्त पगार, कमी बोजा आणि सुखवस्तू जीवन यांच्या लोभामुळे अशा आंतरराष्ट्रीय संघटनांकडे आकर्षित होतात ! अशा वेळी स्वत:च्या देशाला आपली अधिक गरज आहे किंवा स्वत:च्या देशासाठी आपण काही केले पाहिजे, हा विचारही त्यांच्या मनात येत नाही. उदाहरणच द्यायचे झाले तर संयुक्त राष्ट्रसंघाच्या सचिवालयात नियोजित संख्येच्या तिप्पट भारतीय

उच्चासनांवर अधिष्ठित आहेत; इतकेच नव्हे तर या सचिवालयाच्या इमारतीलाही त्यामुळे अनौपचारीकपणे 'इंडिया हाऊस' या नावानेच संबोधले जाते.

३: ज्या राष्ट्रांतून शास्त्रज्ञांची अशी निर्यात होते, त्या राष्ट्रांची सरकारे या विषयाबद्दल अत्याधिक उदासीन आहेत. ही निर्यात थांबविण्यासाठी ही राष्ट्रे कुठलीही कामगिरी करीत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. याची कारणे देताना श्री. नाराघी म्हणतात—

'या उदासीनतेचे मुख्य कारण म्हणजे या राज्यकर्त्यांना स्वतःची मुले पाश्चिमात्त्य राष्ट्रांत शिकविण्यात आणि त्यांनी तेथे स्थायिक होण्यात धन्यता वाटते. स्वतःच्या देशात कष्टाचे जीवन जगण्यापेक्षा यात काही तरी विशेष आहे, अशी राज्यकर्ते सोयीस्कर समजूत करून घेत असतात.

४: श्रीमंत राष्ट्रे स्वतःच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करीत आहेत त्यामुळे ती बहुतांशी अशा अर्धविकसित राष्ट्रांतून आयात केलेल्या 'ज्ञाना'वर अवलंबून राहण्यास शिकली आहेत.

५: अर्धविकसित राष्ट्रांच्या मदतीकरिता आखण्यात आलेले 'विद्यार्थी देवघेव कार्यक्रम' हे त्या अर्धविकसित राष्ट्रांना अतिशय मारक ठरलेले आहेत; कारण या योजनेखाली पाश्चिमात्त्य राष्ट्रांत आलेले ह्या देशांचे विद्यार्थी योजनेचा कालावधी संपल्यानंतर स्वतःच्या देशात काहीसं कष्टी जीवन जगण्याकरिता परतावे लागू नये म्हणून काहीही करण्यास–लग्नेदेखील पाश्चिमात्त्य राष्ट्रांतच उरकण्यास–तयार असतात.

श्री. नाराघी यांनी त्यांच्या अहवालात निदर्शनाला आणलेले विरोधाभासही असेच बोलके नि बोचरे आहेत.

अर्धविकसित राष्ट्रांना माणशी जास्तीत जास्त मदत देण्याची प्रौढी मिरवणाऱ्या फ्रान्स या देशाने टोगो या लहानशा आफ्रिकन राष्ट्राला जितके पदार्थशास्त्रज्ञ पाठविले त्यापेक्षा कितीतरी अधिक शास्त्रज्ञ टोगोमधून फ्रान्सला आयात करण्यात आले.

दक्षिण व्हिएटनाममधून फ्रान्सला जाणाऱ्या वैद्यकीय पदवीधरांची संख्या फ्रान्सहून व्हिएटनामला होणाऱ्या आयातीपेक्षा जास्त आहे! त्यामुळे व्हिएटनाममध्ये असणाऱ्या स्थानिक डॉक्टरांच्या संख्येपेक्षा फ्रान्समध्ये अधिक व्हिएटनामी डॉक्टर आहेत. अशाच प्रकारच्या वैद्यकीय पदवीधरांच्या बाबतीत मोठा प्रवाह सर्व राष्ट्रकुटुंबीय देशांतून ब्रिटनकडे सुरू आहे.

अमेरिका ही पश्चिम युरोपातून वाढत्या प्रमाणावर शास्त्रज्ञांची आयात करीत असल्यामुळे ही तूट भरून काढण्यासाठी पश्चिम युरोपीय राष्ट्रे आशिया व आफ्रिका येथील राष्ट्रांतून शास्त्रज्ञ ओढून घेत आहेत, असेही श्री. नाराघी यांनी नमूद केले आहे.

अमेरिकेच्या अर्धविकसित राष्ट्रांवरील या 'बौद्धिक बलात्कारा'चा उल्लेख करून श्री. नाराघी यांनी हा प्रकार यापुढे अधिक वाढेल, असे भविष्य वर्तविले आहे. त्याची मुख्य दोन कारणे देताना ते म्हणतात :—

"अध्यक्ष जॉन्सन यांनी काँग्रेसमध्ये नुकतेच जे 'इमिग्रेशन विधेयक' मंजूर करून घेतले आहे त्यामुळे आशिया व आफ्रिकेतील राष्ट्रांतून शास्त्रज्ञांची आयात करणे अमेरिकेला सुकर होणार आहे; कारण या विधेयकान्वये पूर्वीची गोऱ्या रहिवाशांच्या संख्येवर आधारित परदेशी रहिवाशांची 'हिस्सा' पद्धती (Quota System) रद्द करण्यात आली आहे."

अमेरिका स्वत:च्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर योग्य तो खर्च करीत नाही; त्यामुळे अमेरिकेला गरीब राष्ट्रांतून प्रशिक्षित

शास्त्रज्ञ आयात करणे आवश्यक होऊन बसले आहे. या विधानावर भाष्य करताना श्री. नाराघी यांनी एक प्रात्यक्षिक करून दाखविले आहे.

अमेरिकेतील वैद्यकीय महाविद्यालयांतून दरवर्षी सात हजार पदवीधर बाहेर पडतात. आणि अमेरिकेची आजची गरज चौदा हजार वैद्यकीय पदवीधरांची आहे. त्यामुळे दरवर्षीची सात हजार वैद्यकीय पदवीधरांची तूट अमेरिकेला आयातीच्या साहाय्याने भरून काढावी लागते. याचा परिणाम असा झाला आहे की, जगात सर्वत्र वैद्यकीय पदवीधरांची अत्यंत गरज असतानाही आज अमेरिकेत परदेशी वैद्यकीय पदवीधरांची संख्या वीस हजार इतकी आहे.

अर्धविकसित राष्ट्रांची ही ' शास्त्रज्ञ लूट ' थांबविण्यासाठी श्री. नाराघी यांनी एका 'आंतरराष्ट्रीय समिती'च्या स्थापनेची सूचना केली आहे. या समितीने ' शास्त्रज्ञ बाजारावर ' लक्ष ठेवून त्या त्या संबंधित अर्धविकसित राष्ट्राला योग्य स्वरूपात भरपाई मिळण्याची व्यवस्था करावी, अशा प्रकारची ही योजना आहे.

नाराघी योजनेवर संयुक्त राष्ट्रसंघाच्या एका स्पष्टवक्त्या अधिकाऱ्याचे विचार मनन करण्यासारखे आहेत. तो म्हणतो,

"जोपर्यंत दरिद्री आणि अर्धविकसित राष्ट्रांतून होणारी शास्त्रज्ञांची ही आयात संपूर्णपणे थांबविली जात नाही किंवा जोपर्यंत श्रीमंत राष्ट्रांना या राष्ट्रांतून फक्त 'अशिक्षित'च मनुष्यबळ मिळण्याची व्यवस्था होत नाही तोपर्यंत अर्धविकसित राष्ट्रांची स्थिती अधिकाधिक खालावत राहणार आहे."

सध्या जे चालले आहे त्याला शिक्षणक्षेत्रात चाललेला उच्च पातळीवरचा ' गुलामांचा व्यापार ' याशिवाय दुसरे नाव देता येणार नाही. ◆

# १

# सायगावचे वार्ताहर



निवेदन : विजय परुळकर

लेखक : अनिल हवालदार

दिएमच्या राजवटीपासून व्हिएटनाम-मधल्या बुद्ध भिक्षूंना आणि वार्ताहरांना जगातल्या वृत्तपत्रीय सृष्टीत भलताच भाव आला. सध्या एक दिवस असा जात नाही की व्हिएटनामची बातमी छापली जात नाही ! सायगावचं 'हॉटेल कॅराव्हेल' या जगभरच्या वार्ताहरांनी खच्चून भरलंय ! गळयात दोन-तीन कॅमेरे अडकवलेले, डोक्यावर वेडेवाकडे केस वाढलेले, मळलेले कपडे आणि चेहऱ्यावर कायम औत्सुक्य दिसलेली व्यक्ती सायगावच्या रस्त्यावर दिसली की तो वार्ताहर समजावा ! सायगावच्या विमानतळावर येणाऱ्या 'व्ही. आय. पीं.'भोवती वार्ताहरांचा गराडा पडून कॅमेऱ्यांचे फ्लॅश उडू लागले की तिथं मुलाखत रेकॉर्ड करणं अवघड होऊन बसतं ! हल्ली निदर्शनांच्या वेळी सायगावात निदर्शकांच्या-पेक्षा वार्ताहरांचीच जास्त गर्दी व्हायला लागलीय !

एखाद्या बातमीशिवाय दिवस गेला तर हे वार्ताहर अगदी अस्वस्थ होतात. बातम्यांच्या 'सेन्सेशन'पायी अनेक अफवांचा जन्म होतो. दिवसभर धावपळ करून आलेले वार्ताहर 'कॅराव्हेल'च्या बारमध्ये संध्याकाळी जमतात आणि बोलता बोलता एखादी नवी बातमी तयार होऊन बाहेर पडते. दिएमची राजवट उलथून पडायला हे वार्ताहर काही अंशी अप्रत्यक्षरीत्या कारणीभूत आहेत. कुठल्याही सामान्य दर्जाच्या लष्करी अधिकाऱ्याला या वार्ताहरांच्या बातम्यांच्या वेडापायी जबरदस्त महत्त्व

प्राप्त व्हायचं आणि सतत मुलाखती देऊन देऊन त्यांनाही आपण कुणी 'विशेष' आहोत असा भ्रम व्हायचा !

## सगळे फकीर एकाच . . .

व्हिएटनाममध्ये फ्रेंच आणि व्हिएटनामी भाषेतून सगळा कारभार चालत असल्यानं या वार्ताहरांसाठी 'दुभाष्यां'ची गरज भासू लागली. थोडंसं इंग्रजी येणाऱ्या व्हिएटनामी पोरांना सध्या भलताच भाव आलाय! मात्र हे दुभाष्ये आपल्या भाषेच्या अपुऱ्या ज्ञानामुळं विपर्यस्त बातम्या अजाणता देतात. 'खळबळजनक बातम्या आणि फोटो' देणारी वार्ताहरांची एक जमात व्हिएटनाममध्ये तयार झाली आहे. हे बहुतेक वार्ताहर अगदी तरुण आहेत. प्रसंगी जीव धोक्यात घालून हे तरुणं फोटो घेतात. यांचा उद्देश एकच ! ताबडतोब आणि भरपूर पैसा मिळवणे ! परदेशी वार्ताहरांना बातम्यांच्या 'टिप्स' देणं हाही सायगावमधला एक धंदा होऊन बसलाय. अशा 'टिप्स' मिळाल्या की एखाद्या पॅगोडासमोर तीस-चाळीस वार्ताहरांचा जथा बसलेला हमखास आढळेल ! तुम्ही 'टिप्स'ना पैसे देता हे एकदा समजलं की तुमच्या खोलीतला फोन दिवसभर खणखणत राहतो आणि अखेर वेड लागायची पाळी येते. बातमी मिळवण्याचा व्हिएटनाममधला उत्तम मार्ग म्हणजे प्रत्यक्ष घटनास्थळी आपण स्वतः जाणं ! एक वार्ताहर दुसऱ्याच्या ताकास तूर लागू देत नाही ! पण गंमत म्हणजे एकमेकांना टाळण्याच्या नादात शेवटी सगळे फकीर मशिदीत ( नव्हे– पॅगोडासमोर ) जमलेले दिसतात !

सायगावमधल्या वार्ताहरांच्या गर्दीत आता स्त्री-वार्ताहरांची भर पडायला लागली आहे. 'पुरुष करतील ते आम्ही करणारच' या विचारानं भारलेल्या या पाश्चात्य तरुणी गळ्यांत कॅमेरे लटकावून पृष्ठभागावर मळलेल्या स्लॅक्स घालून सायगावच्या रस्त्यांतून उगीचच धावपळ करताना दिसतात. अशाच एका तरुण स्त्री-वार्ताहराच्या धिटाईनं आम्ही गारच झालो ! त्याचं असं झालं, आन्खेच्या तळावर आम्हा वार्ताहर छायाचित्रकारांचा तंबूत मुक्काम पडला होता. प्रत्येक तंबूत साधारण सहा कॉटसची व्यवस्था होती. थकून भागून आम्ही तंबूत येऊन बसलो आणि सगळ्यांची नाकं विस्फारली. तंबूत 'इन्टिमेट'चा घमघमाट सुटला होता. पाहतो तो एक सुरेख तरुणी 'शॉवर' घेऊन आली होती आणि आमच्याच तंबूत 'नाईटगाऊन' घालून झोपण्याच्या तयारीत होती. तिनं 'शॉवरबाथ' कसा काय घतला देव जाणे ! कारण अशा तळांवर दहा–दहा शॉवर्सची एक सामुदायिक 'ओपन एअर' बाथरूम असते आणि सैनिक नैसर्गिक अवस्थेत आंघोळ करीत असतात ! असो ! दुसऱ्या दिवशी सकाळी ती तरुणी लष्करी वेषात ब्रेकफास्टला हजर ! मात्र युद्ध किंवा राजकारणावर चर्चा न करता बाईसाहेब खास बायकांच्या गप्पा मारण्यात गुंतल्या होत्या ! त्या दिवशी ती एका मोहिमेची साथ करून खास

वार्तापत्र तयार करणार होती म्हणे ! पुढं तिचं काय झालं हे मला माहीत नाही ! पण बाईच्या धाडसाची कमाल !

माझ्या या सगळ्या निवेदनाचा अर्थ व्हिएटनाममध्ये वार्ताहरांचा सावळा गोंधळच चालू आहे असा मात्र मुळीच नाही. ती चित्राची एक बाजू झाली ! अतिशय चतुर वार्ताहर आणि छायाचित्रकारही व्हिएटनामच्या युद्धभूमीवर पाहायला सापडले. युद्ध खेळण्याच्या पद्धती जशा बदलत आहेत तशा वार्तापत्रं पाठवण्याच्या तऱ्हा दिवसेंदिवस प्रगत होत चालल्या आहेत. घटना घडत नाही म्हणून अस्वस्थ असलेला व्हिएटनाममधला मुरलेला वार्ताहर प्रत्यक्ष दंग्याच्या वेळी अतिशय शांतपणे आणि अचूक काम करताना आढळतो हा एक विशेष ! नाहीतर आपल्या पालम विमानतळावरचे वार्ताहर ! पंधरा वर्षं झाली तरी कुणी ' व्ही. आय. पी. ' आला म्हणजे यांच्या जागेवरून मारामाऱ्या सुरूच !

अमेरिकेच्या हवाई दलानं व्हिएटनाममध्ये सर्व वार्ताहरांसाठी खूपच सोयी केल्या आहेत. रोज सायगावहून दिवसातून एकूण सहा विमानं व्हिएटनामच्या निरनिराळ्या भागात खास वार्ताहरांसाठी सोडली जातात. वार्ताहरांना हा विमानप्रवास फुकट आहे. अमेरिकन सेनेचे स्वतःचे छायाचित्रकार अद्ययावत् सोयींनी सुसज्ज आहेत. त्यांच्या तळा-तळांवर फिरत्या ' डार्क रूम्स ' असल्यानं अतिशय त्वरेने पाहिजे ते फोटो मिळू शकतात.

निव्वळ बातम्या खरडणाऱ्या वार्ताहरांची सायगावमध्ये गर्दी असली तरी व्हिएटनामच्या राजकारणाचा खास अभ्यास करून त्यावर लिखाण करणारे पत्रकारही तिथं आहेत. हॉर्स्ट फास (Horst Fass) सारखा पत्रकार 'व्हिएटनाम'च्या विषयावर ' पुलित्सर प्राईझ'ही मिळवून जातो. ' ए स्ट्रीट विदाऊट जॉय ' किंवा ' न्यू फेस ऑफ् वॉर ' यांसारखी परखड पुस्तकं खळबळजनक ठरतात आणि त्यांना सायगावमध्ये बंदी येते.


व्हिएटनाममध्ये एक वार्ताहर दुसऱ्या वार्ताहराशी चांगलं वागत नसला तरी वाईटही वागत नाही. तिथं एकमेकांची एकमेकांशी अगदी औपचारिक नाती असतात. कुणी कुणाला काही सांगणार नाही. कुणी कुणाचं ऐकण्यात फारसं तथ्य नसतं ! मात्र कुठं धोका असेल तर माहीतगार तुम्हांला सावधगिरीच्या सूचना देतील ! पण त्यासुद्धा औपचारिक सुरांत !

आतापर्यंत व्हिएटनाममध्ये एकूण नऊ वार्ताहर ठार झाले आणि बत्तीस जखमी झाले ! मरणाची धास्ती असली तरी दिवसागणिक व्हिएटनाममध्ये वार्ताहरांची संख्या वाढतेच आहे.

□

## २

# सायगावचे भिक्षू



थिच त्रि क्वांग : भिक्षूंचा नेता

थिच् क्वान डुक (Thiech Quan Duc) नावाच्या बुद्ध भिक्षूनं स्वतःला जाळून घेतलं आणि सायगावच्या बुद्ध भिक्षूंना एका रात्रीत जगभर प्रसिद्धी मिळाली. या आत्मसमर्पणानं बुद्ध भिक्षूंनी जगाची सहानुभूती खेचून घेतली. देशोदेशींचे वार्ता-हर व्हिएटनाममध्ये या बुद्ध भिक्षूंना पाहायला, त्यांच्या मुलाखती घ्यायला धावायला लागले. मीही टेलिव्हिजनवर हा ' जळता भिक्षू ' दाखवावा म्हणूनच सायगावला प्रथम आलो होतो.

सायगावमध्ये क्रांती होऊन दिएमची राजवट उलथून टाकली गेली त्या दिवशी क्रांतीच्या रणधुमाळीनंतर सायगावच्या या बुद्ध भिक्षूंना कॅमेरावर टिपण्यासाठी मी तुरुंगाच्या बाहेर बैठक मारली. दिएम मारला गेल्यानंतर त्याने पकडलेल्या सर्व भिक्षूंची सुटका होणार होती. मी सकाळी ९–९॥ च्या सुमाराला तुरुंगासमोर गेलो. तब्बल दहा तास मी बसून होतो. त्यानंतर त्या बुद्ध भिक्षूंचं प्रथमदर्शन झालं ! पिवळ्या पायघोळ कफन्या आणि तुळतुळीत तासलेली डोकी !

दिएम नामशेष झाल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ एका बुद्ध भिक्षूनं स्वतःला जाळून घेतलं ! दिएमचा पाडाव झाला तर स्वतःला जाळून घेईन असा तो बुद्धदेवाला नवस बोलला होता म्हणे ! आनंदप्रदर्शनार्थ केलेलं हे आत्मसमर्पण पाहण्याचा आमचा हा योगही हुकला !

दिएमनंतर व्हिएटनामच्या राजकारणात बुद्ध भिक्षूंचा प्रामुख्यानं वावर होऊ लागला. तिथल्या राज्यकारभाराची सूत्रं त्यांच्या तंत्रानं हलू लागली. पण या महत्त्वाकांक्षी बुद्ध भिक्षूंचं संपूर्ण समाधान करण्यास व्हिएटनाममधलं एकही सरकार समर्थ ठरलं नाही. या भिक्षूंच्या मागण्यांना कधी अंत नाही आणि त्यांच्या सगळ्या मागण्या पुरवणं कुठल्याही सरकारला अशक्य आहे. आपल्या मागण्या पुऱ्या झाल्या नाहीत की हे बुद्ध भिक्षू हिंसात्मक निदर्शनं सुरू करतात. थिच् त्रि क्वांग (Thiech Tri Quang) हा डाव्या गटाचा भडक माथ्याचा बुद्ध भिक्षू अशा हिंसात्मक निदर्शनांच्या योजना आखण्यात सदैव गुंतलेला असतो. थिच् फाप् त्रि (Thiech Phap Tri) हा गुबगुबीत चेहऱ्याचा भिक्षू डाव्या-उजव्या गटांचा समझोता करण्याच्या खटपटीत असतो. थिच् ताम् चाऊ (Thiech Tom Chou) हा बुद्ध भिक्षूंचा नेता मात्र समजूतदारपणे सरकारशी वाटाघाटी करीत असतो.

## दंगलींना सुरवात

सालॉर्द पॅगोडावरच्या हल्ल्यानंतर आता बुद्ध भिक्षूंनी आपल्या राजकीय हालचाली व्हिआडाव (Vien Hoa Dao) या पॅगोडातून चालवल्या आहेत. जनरल कान्हच्या कारकीर्दीत व्हिएटनाममध्ये हे बुद्ध भिक्षू जाळून घेणाऱ्या भिक्षूंचं राजकीय भांडवल कसं करतात याचा अजब नमुना मला पाहायला मिळाला. त्या बुद्ध भिक्षूंच्या संघटनेनं बुद्धजयंती करायची ठरवली. बुद्धाचा एक मोठा पुतळा उभारला गेला. त्याच्या पायथ्याशी काचेच्या एका ग्लासात थिच् क्वान डुक या जाळून घेतलेल्या पहिल्या भिक्षूचं 'पवित्र हृदय' ठेवण्यात आलं होतं! जवळ जवळ चाळीस ते पन्नास हजार बुद्ध भिक्षूंनी सकाळी मिरवणूक काढली होती. त्यांना प्रतिशह देण्यासाठी जन. कान्ह दस्तुरखुद्द त्या 'पवित्र हृदयाला' नमस्कार करून गेल्यानं त्या दिवशी बुद्ध भिक्षूंना दंगा करता आला नाही. त्या बुद्ध भिक्षूंनी एक प्रदर्शन भरवलं होतं! प्रदर्शनात जिकडे तिकडे जळणाऱ्या भिक्षूंची चित्रं भडक रंगांत रंगविलेली पाहायला मिळाली! बुद्धाला साखळ्या बांधल्या आहेत आणि तो बंधमुक्त व्हावा म्हणून भिक्षू जाळून घेतोय अशा आशयाचंही एक चित्र पाहायला मिळालं!

अखेर जनरल कान्हला राजीनामा द्यावा लागला! सायगावात पुन्हा बुद्ध भिक्षूंच्या दंगली पेटल्या! कॅथॉलिक आणि भिक्षू यांच्या भयानक दंगली सुरू झाल्या! अमेरिकेविरुद्ध उघड उघड निदर्शनं सुरू झाली. याच वेळी व्हिएटनाममध्ये ("When Thiech Tri Quaug Speaks – White House shakes!") हा वाक्प्रचार प्रचारात आला. कॅथॉलिक आणि भिक्षूंचे हे दंगे चित्रीत करीत असताना आमच्या जर्मन टेलिव्हिजनच्या शेफलर नावाच्या कॅमेरामनच्या पायात बंदुकीची गोळी घुसून तो जखमी झाला. त्याची जागा घ्यायला मला दिल्लीहून त्वरेनं सायगावला जावं लागलं.

रात्री आठ वाजता सायगावच्या विमानतळावर उतरलो तर रस्त्यात अजून निदर्शने चालू आहेत असं दुभाष्यानं सांगितलं. मी हॉटेलात सामान टाकलं आणि कॅमेरा घेऊन तडक दंगलीचा रस्ता गाठला. रस्त्यावर दगडांचा खच पडला होता. पोलिस पोलादी शिरस्त्राणं घालून उभे होते. दगडांपासून संरक्षण करायला हातात ढाली होत्या आणि बंदुकीच्या बागनेटांवर अश्रूधुराचे बाँब लावलेले होते. जवळच्या गल्लीतून वीस-पंचवीस पोरं डबे बडवत यायची, दगड फेकायची, पोलिस त्यांच्यावर अश्रूधूर सोडायचे, ती पोरं मागं पळून जायची! मी भराभरा पोलिसांचे काही शॉटस् घेतले. अश्रूधुराने डोळे चुरचुरायला लागले होते. मला काही चित्रण निदर्शकांच्या बाजूला जाऊन करायचं होतं! पलीकडं जाणं अवघड होतं! शेवटी पोलिसांचं कडं तोडून मी माझ्या दोन सहकाऱ्यांच्याबरोबर पलीकडं गेलो. पलीकडे जातो न जातो तोच पोलिसांनी अश्रूधुराचे बाँब टाकायला सुरुवात केली आणि एक बाँब सरळ माझ्या डाव्या कुशीत धाडकन येऊन आपटला. जवळ जवळ तो दीड पौंडी अश्रूधुराचा बाँब जबरदस्त वेगानं कुशीत आदळून पायाशी फुटला आणि मी उभाच्या उभा खाली कोसळलो. माझी शुद्ध हरपली. माझ्या सहकाऱ्यांनी मला खेचून लांब नेलं आणि तोंडावर पाणी मारून शुद्धीवर आणलं! दुसऱ्या दिवशी माझ्या डाव्या कुशीची चामडी सोलून निघाली होती!

या घटनेचा मला फायदा मिळाला. पोलिसांचा मार लागून मी पडलेला निदर्शकांनी पाहिलं होतं. त्यांची मला सहानुभूती मिळाली. मी त्याचा पुरेपूर उपयोग करून घेतला. त्यांच्या दंगलीचे शॉटस् मला भरपूर प्रमाणात त्यांनी घेऊ दिले. त्या पोरांच्या मागे आठ-दहा बुद्ध भिक्षू उभे होते आणि ते त्या पोरांना चिथावणी देऊन दगडफेक करायला पाठवत होते. हा प्रकार पहाटेपर्यंत चालला होता. अशी दंगल सात दिवसपर्यंत चालली होती!

## उपोषणाचा नवा प्रकार

ह्यानंतर सायगावमध्ये वारंवार दंगली व्हायला लागल्या. बुद्ध भिक्षूंनी तऱ्हेतऱ्हेनी सरकारला त्रास द्यायचा प्रयत्न केला. पण सध्याचा व्हिएटनामचा प्रमुख एअर-व्हाईस मार्शल काऊ की (Cao–Ky) यानं कधी युक्तीनं तर कधी शक्तीनं बुद्ध भिक्षूंना गप्प बसवलं आहे. मध्यंतरी दनांग हे शहर बुद्ध भिक्षूंनी आपल्या ताब्यात घेतलं! सैनिकांनी वेढा घातला. त्यांनी आत प्रवेश करू नये म्हणून इकडे सायगावात व्हिनोआडाव पॅगाडोसमोर एक चिता कायम रचून ठेवली होती. सैनिक आत आले तर स्वत:ला जाळून घेऊ अशी दहशत घातली! काऊ कीने सरळ दनांग परत आपल्या ताब्यात घेतलं!

त्यानंतर या भिक्षूंनी एक नवीनच शक्कल काढली. त्यांनी लोकांना आपल्या घरांतले देव्हारे रस्त्यावर आणून त्यांची पूजा करायला सांगितली. वाहतूक अडली! काऊ की वस्ताद! त्याचे पोलिस त्या देव्हाऱ्यांना नमस्कार करून ते सरळ उच-

लायचे आणि पोलिस चौकीवर नेऊन पुन्हा त्यांची पूजा करायचे ! लोकांना काहीच बोलता येईना !

मग जवळ जवळ दोन हजार म्हाताऱ्या भिक्षूंचा अन्नसत्याग्रह सुरू झाला. हे भिक्षू बारा तासांचा अन्नसत्याग्रह करणार होते. सकाळी नऊला उपोषण सुरू झालं ! आम्ही कॅमेरे सरसावून बसलो. तासाभरातच त्या भिक्षूंना घाम फुटला ! त्यांचे चेले त्यांना लिंबू घालून बर्फातला चहा पाजू लागले ! फळांचा रस देऊ लागले ! अशी खाऊन–पिऊन उपोषणं करण्याची पद्धत मी प्रथमच पाहिली ! थोड्याच वेळात पोलिस आले आणि त्यांनी भराभर अश्रूधूर सोडला. सगळे म्हातारे भिक्षू आणि वारकी पोरं पाच मिनिटांत पॅगोडात पसार ! पोलिसांनी तीन दिवस पॅगोडाला वेढा घातला. अखेर खरोखर 'उपास' घडलेली पोरं पॅगोडाबाहेर आली. थिच् ताम् चाऊनं सरकारशी समझोता केला !

## ते भयानक दृश्य

उपोषणाचा प्रकार फसल्यावर पॅगोडात रोज संध्याकाळी राजकीय विषयावर भाषणं सुरू झाली. या भाषणांना श्रोते फक्त म्हाताऱ्या बायका ! पुन्हा तीन दिवसांनंतर दंगली सुरू झाल्या.

ह्याच सुमाराला एका एकोणीस वर्षांच्या बुद्ध भिक्षुणीनं स्वतःला जाळून घेतलं ! दुपारी दोन वाजता बुद्ध भिक्षूंनी वार्ताहरांना मुद्दाम बोलावून घेतलं ! पॅगोडातलं ते दृश्य पाहून अंगावर काटा आला ! एका प्लॅटफॉर्मवर त्या बुद्ध भिक्षुणीचा जळून विद्रूप झालेला नग्न देह ठेवला होता आणि तिथे भिक्षू छायाचित्रकारांना त्या भिक्षुणीचे फोटो घ्यायचा आग्रह करीत होते. प्रसिद्धीचा तो हव्यास चीड आणणारा होता. मी त्या प्रकाराचे चित्रीकरण करण्यास नकार दिला आणि तडक बाहेर आलो. बुद्धाचा अहिंसा 'धर्म' आम्ही आजपर्यंत शिकलो ! त्याच बुद्धाचे हे हिंसक अनुयायी पाहिले की मनात गोंधळ होतो. धर्माच्या नावाखाली सत्तेची लालसा लपलेली दिसते. विचारी लोकांची या धर्मवेडांविषयीची सहानुभूती नष्ट होते.

बुद्ध भिक्षूंचे हे उपोषणांचे फार्स अजूनही चालू आहेत. काऊ की त्यांना आता पुरून उरलाय ! मध्यंतरी थिच त्रि क्वांगने दनांगमध्ये आमरण उपोषण सुरू केले ! इकडे व्हिनोआडाव पॅगोडात सरकारविरुद्ध गलिच्छ प्रचार सुरू झाला ! सैनिक पॅगोडात घुसले तर जाळून घ्यायची धमकी दिली. काहीतरी 'सेन्सेशनल' घडणार म्हणून आम्ही सारे पॅगोडाभोवती गोळा झालो. तीन दिवस उलटले. चौथ्या दिवशी एक तरतरीत व्हिएटनामी कर्नल सैनिकांना घेऊन आला. त्याने लाऊड-स्पीकरवरून भिक्षूंना शरण यायला सांगितलं ! त्याला पॅगोडातून लाऊडस्पीकर-वरून उत्तर मिळालं ! सुमारे अर्धा तास दोन्ही बाजूंचे लाऊडस्पीकर दणाणत होते; शेवटी त्या कर्नलची सहनशक्ती संपली. त्याने रागाने बंदूक उचलून पॅगोडावर रोखली आणि तो व्हिएटनामी भाषेत काहीतरी बोलला. मग एकदम शांतता !

त्यांचा समझोता झाला आणि आमचा अपेक्षाभंग !

पण हा समझोता फार थोडा काळ टिकला. दोनच दिवसांत एका पोलिसाचा त्याच्याच कमरेचे रिव्हॉल्व्हर हिसकून गोळ्या घालून खून करण्यात आला. तो कर्नल तडक पॅगोडात घुसला. सगळ्या बुद्ध भिक्षूंना त्यानं ओळीत उभं केलं ! त्यांच्याकडं एकदां पाहिलं आणि एका पोरसवदा तरुणाला पकडून ताडकन तो निघून गेला. आम्ही त्याला नेमका खुनी कसा पकडला हे विचारलं, तेव्हा तो म्हणाला– "सोपं होतं ! त्याचं डोकं ताजं तासलेलं होतं ! बाकीच्या भिक्षूंच्या डोक्यावर थोडे केस वाढलेले होते ! त्या पोरानं काल पोलिसाचा खून केल्यावर त्याचं रात्री डोकं तासून भिक्षू म्हणून त्याला पॅगोडात लपवलं होतं ! " त्या कर्नलच्या चातुर्याचं कौतुक वाटलं !

सायगावचे हे 'हिंसक भिक्षू' हळू हळू अप्रिय होत चालले आहेत. सुरुवातीला मिळालेली सहानुभूती त्यांनी गमावली आहे. त्यांचा प्रसिद्धीचा हव्यास आता वार्ताहरांनाही उबग आणायला लागलाय ! पुन्हा प्रसिद्धी मिळविण्यासाठी आता त्यांना जाळून घेण्यापेक्षाही काहीतरी मोठं दिव्य करावं लागेल ! ●


## 'ललित' पारितोषिक–योजना

'ललित' मासिकातर्फे जानेवारी १९६६ ते डिसेंबर १९६६ या अवधीत प्रसिद्ध झालेल्या एकूण मराठी पुस्तकांतील पाच सर्वोत्कृष्ट पुस्तकांना प्रत्येकी ५०० रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे.

आपणांस उत्कृष्ट वाटलेल्या कोणत्याही पाच पुस्तकांची नावे वाचकांनी ३० एप्रिल १९६७ पर्यंत आम्हांस कळवावीत.

वाचकांनी सुचविलेल्या पुस्तकांतील मताधिक्क्याने पहिली पंचवीस पुस्तके एका समीक्षक मंडळाकडे निर्णयासाठी देण्यात येतील. हे समीक्षक मंडळ यांतून पाच पुस्तकांची निवड करील आणि हा निर्णय अंतिम समजण्यात येईल.

ज्या वाचकांच्या निवडीत पारितोषिक–पात्र सर्व पुस्तकांची नावे बिनचूक असतील त्यांना रुपये २०० चे पारितोषिक (पुस्तकरूपाने) देण्यात येईल.

ज्या प्रकाशकांची पुस्तके पारितोषिकार्ह ठरतील त्यांचा 'मानचिन्ह' देऊन गौरव करण्यात येईल.

या योजनेसाठी आम्ही रसिकांचे सहकार्य अपेक्षित आहोत.

**'ललित' पारितोषिक समिती**

**२११ ए/२, राजा राममोहन रॉय मार्ग, मुंबई ४. बी. आर.**

# किल्ले प्रतापगड

अजून त्याचा स्पर्श मिळविते तसूतसूवर इथे धरा
अजून त्याचे पवाड गाती तटबुरुजातिल चिरा चिरा
पल्याड तिकडे रायगडाची शान नभाला खडी भिडे
अन् मोऱ्यांच्या जावळिचे हे खोरे झाडीतुनी दडे
ज्या कृष्णेच्या पाण्याकाठी हा जळता इतिहास घडे
सह्याद्रीच्या कुशीत पहिली इथे तियेची उडी पडे
अजून त्याची कीरत वाही या खडकातिल झरा झरा १

ताठ राहिल्या पाठी त्याच्या घाटी मावळ मुलुखाच्या
हाक ऐकता खवळुन उठल्या चौदा ताली कोकणच्या
इथे त्याची घुमली वाणी भिनली भरली रक्तात
लाख लाख पडसाद उठविती कंप शहांच्या तख्तात
खुळा बावळा असा मावळा तळहातावर घेइ शिरा २

शिळेशिळेवर शिजली इथल्या किती खलबते लालनिळी
किती मनसुबे रचले गेले बुरुजावर या तटातळी
घळी जाळितुन मार्ग उमटला इथे साहसी विजयाचा
याच पायऱ्या चढून गेला मान मराठी मुलुखाचा
धूळ कपाळी लावुन मर्दा पायरीस या कर मुजरा ३

दगडादगडांआड पेरला पिढ्यापिढ्यांचा सूड इथे
जाळीत रोखल्या नजरा जळती उरी दाबुनी चीड इथे
शस्त्रास्त्रांची धार नव्हे ही क्रुद्ध दैवते झळाळली
मायभवानी कालिस्वरूपी वाघनखातुन कडाडली
धडाडले रण, गण संतानी इथे बुडाला पुरा पुरा ४

त्या मूर्खांना माहित नाही या मातीची इरेसरी
माहित नाही पहाड इथले उभे बाळगुन आग उरी
जिद्द येथली ठेचाया ` ही बुणग्यांची फौज बडी
घाव मराठी बसता त्यांची इथे कयामत होय खडी
गरूर शाही झडला, गळला सरताजांतिल इथे तुरा ५

—व. गो. कळस्कर

# ३

## भूकबळी पडत आहेत का?

## होय होय होय

बोध गया
मार्च ६

माणूस प्रतिनिधी

लोक मरताहेत. ‘ भूक भूक ’ करीत उपासमारीने खरोखर शेकडो लोक टाचा घासून घासून प्राण सोडीत आहेत. अन्न नाही, पाणी नाही, पैसा नाही, काम नाही, म्हणून बिहारातील लाखो गरीब लोक मृत्यूच्या दारी पडले आहेत. भूकबळी पडायला अगोदरच सुरुवात झाली आहे. दूरदूरच्या खेड्यांतील दरिद्री शेतकरी की, ज्यांच्यापर्यंत सरकारी रेशन पोचत नाही, खाजगी साहायता समितीचे अपुरे कार्यकर्ते आणि अपुरे धान्य पोचू शकत नाही, ज्यांच्यावर कोसळलेल्या संकटाची बाहेरच्या जगाला पुसटशीही जाणीव नाही—असे दुबळे जीव कुठलाही गाजावाजा न करता, सरकार-दरबारी नोंद न करता शांतपणे प्राण सोडू लागले आहेत. जे अजून मेलेले नाहीत ते वाटेल त्या हिरव्या झाडांच्या बिया, फळे, फुले खाऊन प्राण वाचविण्याचा असहाय प्रयत्न करीत आहेत. आणि परिस्थिती अशीच राहिली, या लोकांना पुरेशी मदत पोचली नाही तर मे—जून महिन्यांत बिहारमधील लाखो जीव उपासमारीने तडफडून तडफडून मरतील.

बोध गयेच्या समन्वय आश्रमात पोचलो, तेव्हा मला थोडा उशीर झाला होता. आश्रमाचे चालक आणि बोध गया विभाग रिलीफ कमिटीचे प्रमुख श्री. द्वारको सुंदरानी नुकतेच बाहेरच्या एका खेड्यात गेले होते. तिथे काही भूकबळी पडल्याची

बातमी होती आणि आणखी काही लोक मृत्युपंथावर असल्याचे कळले होते म्हणून ते पहाटेच तिकडे धावले होते.

दुपारी ते थकून भागून आले. घाईघाईने मी त्यांना विचारले, "खरोखरच भूक बळी पडताहेत का? किती लोक मेलेत?"

द्वारकोजींनी क्षणभर माझ्याकडे विचारमग्न दृष्टीने पाहिले. मग श्वास टाकून ते म्हणाले, "आता किती लोक मरताहेत हे विचारू नका. दहांत, विसांत किंवा शेकड्यांमध्येही मोजू नका. एकट्या गया जिल्ह्यात लाखांनी लोक मरणार आहेत. मरणाच्या वाटेवर आहेत. परिस्थिती अशीच राहिली तर मे—जूनमध्ये लाखो लोक अन्नावाचून तडफडून मरतील!"

क्षणभर मी सुन्न झालो. अशा बोलण्यावर चटकन विश्वास बसत नाही; पण नंतरचे दोन-तीन दिवस मी द्वारकोजींबरोबर आणि इतरांबरोबर बोध गया विभागाच्या दक्षिणेच्या खेड्यापाड्यांमधून हिंडलो, तेव्हा माझी खात्री पटली.

या भ्रमंतीत मी अन्नावाचून मेलेली माणसे पाहिली. चाऱ्यावाचून मेलेली गुरे पाहिली. पोटे फुगलेली, हातापायांच्या काड्या झालेली, अशक्तपणामुळे बोटही हलवू न शकणारी निपचित पडून राहिलेली दोन-तीन दिवसांची सोबती असलेली मुले, म्हातारे, कपड्याविना आपली लाजही राखू न शकणाऱ्या मरणोन्मुख तरुण मुली, "हम मर रहे हैं सरकार"

म्हणून कण्हलेल्या स्वरांत केविलवाणा टाहो फोडणारे स्त्री-पुरुष, खायला मिळत नाही म्हणून शिवरीच्या कापसाची फुलं, एरंडीच्या बिया, आणखी काहीतरी खाणारी माणसे, मरणाचे दु:ख वाटू नये म्हणून बेलाची फळे रोज भाजून खाऊन झिंगून पडणारी बाया-माणसे शरीराचा केवळ हाडाचा सांगाडा उरलेले, प्रत्येक हालचालीसाठी श्वास टाकणारे मानव प्राणी—सारेच भयंकर !

अन्नावाचून तडफडून मरत असलेला माणूस ज्यांनी पाहिला आहे, त्यांनाच या भयंकरपणाची कल्पना येईल. अतिशय क्षीण स्वरामध्येही वेदना व्यक्त करताना त्याला त्रास होतो. डोळे अगोदरच मेलेल्या माणसासारखे झालेले असतात. हाडांवर चामडी वाळत टाकल्यासारखी वाटते. श्वासोच्छ्वास करण्याच्याही त्याला वेदना होत असतात. मुख्य म्हणजे आपण मरणार आहोत, याची त्याला जाणीव असते. त्यामुळे त्याच्या मेलेल्या डोळयांमध्येही एक विलक्षण दु:खी भाव आलेला असतो. आपल्याला त्याच्याकडे पाहवत नाही. अपराधीपणा वाटतो. असे कैक लोक मी पाहिले.

## हम मर रहें हैं सरकार !

आणि ही स्थिती मी पाहिली ती बोध गयेपासून अवघ्या १०–१२ मैलांवर. मोठ्या रस्त्यांपासून, रेलमार्गांपासून आणि शहरांपासून जो जो दूर जावे, तो तो परिस्थिती अधिकाधिक बिकट बनत जाते. पैसे मिळावेत म्हणून लोक जमिनी विकायला काढतात. त्या एकतर कुणी घेत नाहीत. घेतल्या तर अगदी कवडी मोलाने. जनावरे स्वतःच्या डोळयांनी मरताना पाहण्यापेक्षा विकलेली बरी म्हणून मिळेल त्या किंमतीला जनावर विकली जातात. तीन-तीन, चार-चार एकर जमीन असलेल्या शेतकऱ्यांच्या झोपडीत जाऊन पाहावे तो सगळा ठणठणाट ! एक-दोन अस्थिपंजर म्हातारीकोतारी पडलेली, दोन-तीन रिकामी मातीची गाडगी मडकी, बस्स् ! धातूची भांडी नाहीत, की दुसरा कोणताही कपडा नाही, की कांबळी नाहीत. सारी झोपडी आतल्या सामानासकट विकायला काढली तरी कुणी पाच रुपयांनाही घेणार नाही ! कुणी पाहायला आले म्हणजे लोक ओरडतात, “हम मर रहें हैं सरकार—काम दो—अनाज दो—जान बचाव—”

भुकेचे हे नागडे थैमान पाहिले की साऱ्या रूढ कल्पनांना धक्का बसतो. मानवता, मानवी संस्कृती, शिष्टाचार, जीवनातला क्षुद्र आनंद, सारे सारे तुच्छ वाटू लागते. आयुष्यातल्या एवढ्याशा महत्त्वाकांक्षा, उराशी बाळगलेली स्वप्ने, ध्येये सारी कोसळून पडतात. आणि भूक—कणाकणाने जीव घेणारी, एखाद्या पिशाच्चाप्रमाणे संथ पावलांनी येऊन हळूच गळे दाबून जीव घेणारी अक्राळविक्राळ राक्षसी भूक—हीच सारे काही आहे, असे वाटू लागते. बोध गया प्रखंडात सारा जीव ओतून दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी अहर्निश झटून फाटलेल्या आकाशाला ठिगळ लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांनाही असेच वाटत होते. आणि या पार्श्वभूमीवर

या भयाण संकटाचा फायदा घेऊन आधीच मरत असलेल्या लोकांना पुन्हा मारून आपल्या स्वार्थाची पोळी पिकविणाऱ्या क्षुद्र लोकांचा संताप येतो.


गया जिल्ह्यात खरोखरच आकाश फाटले आहे. जिल्ह्याच्या ४६ ब्लॉक्सची एकूण लोकसंख्या सुमारे ३६ लाख आहे. ९५० ग्रामपंचायती आहेत: त्यांपैकी ४२ ब्लॉक्समधील ८५० ग्रामपंचातींना–विशेषत: जिल्ह्याच्या दक्षिण भागात–दुष्काळाचा जबरदस्त तडाखा बसलेला आहे. गया जिल्ह्याचा दक्षिणेकडचा भाग थोडासा खडकाळ आणि जंगली आहे. या भागातील बऱ्याच ठिकाणी तर गेली तीन वर्षे पावसाविना गेली आहेत. तशी जिल्ह्याची बरीचशी जमीन सुपीक आहे. पावसाचे प्रमाण वर्षाला सुमारे ४५ इंच असे आहे; पण पर्जन्यराज लहरी आहेत. पावसाची समप्रमाणात वृष्टी कधीच होत नाही. एकदम जोरजोरात पाऊस येऊन जातो. अनियमितपणा फार! तरीही पाऊस आला की, जिल्ह्यातल्या साऱ्या उत्तरवाहिनी उथळ नद्या भरभरून वाहू लागतात आणि किनाऱ्याने सुपीक गाळ पसरवितात. पावसाळा संपला की त्या आटून जातात.

जिल्ह्यामध्ये बारीक सारीक कालव्यांचे जाळे बरेच मोठे आहे. पण या कालव्यांचा उपयोग नद्यांना पाणी असेल तेव्हाच. हजारो पाझर तलाव जिल्ह्यात असल्याने विहिरींना पाणी नेहमी भरपूर असते. पावसावर सुमारे सव्वातेरा लाख एकरांत भाताचे पीक काढले जाते आणि हिवाळ्यात विहिरींच्या, तलावांच्या आणि कालव्यांच्या साहाय्याने एक लाख चौतीस हजार एकरांत गव्हाचे काढले जाते. पाऊस चांगला आला की धान्य भरभरून निघते. एकराला सुमारे १० मण तांदूळ निघतो. जमिनीत पाणी भरपूर असल्याने एखादे वर्षी पाऊस जरा कमी आला तरी निभावले जाऊ शकते. त्या हिशेबाने गया जिल्हा आणि खरे म्हणजे सारा बिहारच दुष्काळापासून नैसर्गिकदृष्ट्याच सुरक्षित होता. बिहारच्या आणि गया जिल्ह्याच्या जुन्या गॅझेटियर्समध्ये तर गया जिल्हा आणि बिहार हे दुष्काळांपासून साधारणपणे सुखरूप कसे आहेत हे खात्रीने पटविले आहे. १८६६ आणि १८७४ या दोन वर्षी धान्याची थोडी कमतरता भासली होती. बाकी सारा भाग सुरक्षित होता.

## मरणोन्मुख भूमिहीन

पण अलीकडे अलीकडे मात्र ही नैसर्गिक सुरक्षितता खोटी ठरू लागली आहे ती पावसाच्या लहरीमुळे. १९४८–४९ आणि ५२–५३ या वर्षी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडला होता आणि नव्या विहिरी खोदण्याची मोठी योजना त्या वेळी हाती घेण्यात आली होती.

आता यंदाचा दुष्काळ मात्र अत्यंत उग्र आहे. गेली चार–पाच वर्षे सतत पावसाचे प्रमाण कमी झालेले. आणि त्यात गेल्या दोन वर्षांत आणि काही काही ठिकाणी गेल्या तीन वर्षांत पावसाने तोंडच दाखविलेले नाही. नद्या तर नेहमीप्रमाणे आटलेल्याच. पाझर तलाव – त्यांना इकडे आहर म्हणतात. आणि विहिरीही सुकलेल्या.




**दुष्काळी भागाची कल्पना**

विहिरींमध्ये जिथे पाच–सात फुटांवर पाणी लागायचे तिथे आता ४०–५० फूट खणले तरी पाणी लागत नाही. नद्यांच्या पात्रात दहा–बारा फूट खाली जावे, तेव्हा कुठे पाणी लागते. पावसाच्या अभावामुळे सारा भात करपला आणि पाण्याच्या अभावामुळे हिवाळी गहू. ज्यांनी गहू पेरलाच नाही ते शहाणे ठरले. कारण ज्यांनी पेरला त्यांचा गहू वाया गेला. जिथे विहिरी अगोदरच खोल होत्या आणि विजेचे पंप चालू होते अशा ठिकाणी गव्हाने थोडा जीव धरल्यासारखा दिसतो आहे, पण गहू वाढला नाही. आता वारे– आँधी– सुरू झाले आहेत. याही गव्हाला नुकसान आहे. आकडेवारीतच सांगायचे झाले तर या वर्षी जिल्ह्यामध्ये पावसाळी पीक चार ते पाच टक्के आणि हिवाळी पीक शून्य टक्के !

लागोपाठ दोनदा हे संकट कोसळल्यामुळे शेतीवर जगणाऱ्या सर्वांवरच आपत्ती आली आहे. परंतु सर्वांत हाल आहेत भूमिहीनांचे. जिल्ह्यात सुमारे ४ लाख भूमिहीन शेतमजूर कुटुंबे आहेत. अन्न तर कमी आहेच, पाणीही नाही. ही कुटुंबे मरताहेत. परिस्थिती वाचविण्यासाठी सरकारने दोन तऱ्हेच्या योजनांच्या घोषणा केल्या आहेत.

दुष्काळी कामे काढून साऱ्या दुष्काळग्रस्त लोकांना मजुरी पुरविणे आणि प्रत्येक ग्रामपंचायतीत रेशन दुकान काढणे ! पण या दोन्ही योजना कागदावरच उपयोगी पडतात. प्रत्यक्ष व्यवहारात त्या असफल ठरल्या आहेत. गया जिल्ह्याचे रिलीफ कमिटीचे प्रमुख श्री. दिवाकरजी म्हणाले, " एकतर दुष्काळी कामे जी काढली आहेत ती पुरेशी नाहीत. इतकी तोटकी कामे आहेत, की पंचायतीमधील सर्व गरजू लोकांना कामे मिळत नाहीत. दुसरे म्हणजे ठेकेदार ही कामे घेतात. पण लवकर सुरू मात्र करीत नाहीत. रेशन दुकानांच्या बाबतींत एकतर दुकानांमध्ये रेशन येतच नाही. आले तर लबाडी होते. आणि भूमिहीनांजवळ पैसा नसल्याने ते धान्य विकतही घेऊ शकत नाहीत. परिणाम– मूकबळी ! "

यावर उपाय म्हणजे या सर्व चार लाख भूमिहीनांच्या कुटुंबांना म्हणजे सुमारे २५–२६ लाख लोकांना आठ महिने एक तर मोफत अन्न पुरविणे किंवा त्यांना काम देऊन त्याच्या बदल्यात अन्न पुरविणे. शक्य असेल तेथे घाईघाईने विहिरी खोल करून विजेच्या पंपाने पाणी बाहेर काढून रबी गहू वाचविणे आणि पिण्याचे पाणी पुरविणे. याच हिशेबात इतरही दुष्काळी जिल्ह्यांत उपाय झाले पाहिजेत. काम प्रचंड आहे. आणि आता उशीर झाला आहे. सरकारने युद्ध प्रयत्नांसारखे लक्ष घालून काम केले तरच परिस्थितीला थोडाफार आळा बसण्याची शक्यता आहे. पण सरकारने मूकबळी पडायला सुरवात होईपर्यंत आवश्यक तेवढ्या गंभीरतेने इकडे लक्षच पुरविले नाही.

"हा: या निवडणुका–हे राजकारण–" श्री. द्वारकोजी सुंदरानी म्हणत होते, " यांनी सारे वाटोळे केले. आणि आता लोक मरताहेत, तरी कुणाचे लक्ष नाही."

"–हॉरीबल, टेरीबल...काय होणार ! कसं होणार या लोकाचं. काही कळत नाही. च्–च्." जोरजोराने मान हलवीत मिसेस जिल म्हणत होत्या. एकीकडे आपली स्टेशनवॅगन भरधाव हाकण्याचे त्यांचे काम चालूच होते. एकीकडे तोंडाने त्या सारख्या पुटपुटत होत्या, " काय उपाय आहे यावर काही कळत नाही. "

मिसेस जिल या सुमारे ५६ वर्षांच्या प्रवासी ब्रिटिश बाई. त्यांना वृद्धा म्हणणे चुकीचे होईल. सकाळीच त्या द्वारकोजींना खेड्यांच्या रस्त्यांमधून ५०–६० मैल आपल्या स्टेशनवॅगन मधून हिंडवून आल्या होत्या. काही ठिकाणी धान्य पोचवून आल्या होत्या. आणि आता २५–२६ मैलांवरील एका आडवळणाच्या खेड्यात एक डॉक्टर व काही धान्य घेऊन येण्याचे त्यांनी कबूल केले होते. त्यासाठी बोध गयेहून पाच मैल गयेला जायचे होते आणि तेथून पाच मैल परत येऊन नंतर पुढे जायचे होते. जगाच्या प्रवासाला निघालेल्या मिसेस जिल या आपल्या स्टेशनवॅगनमधून बोध गयेला आल्या तेव्हा समन्वय आश्रमात द्वारकोजींशी त्यांची गाठ पडली. दुष्काळासाठी द्वारकोजी आजूबाजूच्या खेड्यांत सारखी धावपळ करीत होते.

[ पृष्ठ ३४ वर ]

" आम्ही भांडवलशाहीचे निर्दालन करू
भांडवलदारवर्गाचे चूर्ण चूर्ण करून टाकू
चूर्ण करू . . . हा-हा-हा
Grind them to Powder...to powder...Ha-Ha-Ha "
" तुम्ही आमची क्रांती कदाचित् चिरडू शकाल
माझी सत्ता उखडून टाकू शकाल
पण विसरू नका

## ही ठिणगी

साऱ्या जगाचा आता भडका उडवून दिल्याशिवाय राहणार नाही."
या ठिणगीचा अर्थ .................... ! आणि अनर्थही ................. !

## ५० वर्षांपूर्वी

६ नोव्हेंबरच्या काळोख्या रात्री
–पेट्रोग्रॅडच्या रस्त्यावरून
सैनिकी पहारे चुकवीत
चेहरा अर्धवट झाकलेला, खोटच्या मिशा–
अटकेची टांगती तलवार, कुठूनही गोळी घुसण्याचे भय–
नियतीला एक धक्का देण्यासाठी–
–To give History a push–
ठिणगीतून वणवा भडकविण्यासाठी
आपल्या ईप्सितस्थळी निघालेला
हा कालपुरुष कोण ?

## व्होल्गा



त्याची पिपासा, त्याची स्वप्ने आणि स्वप्नभंग
दुर्दैवी अखेर ! गूढ मृत्यू !
मृत्युनंतर पसरलेली ती भयाण शांतता !

## तो कालपुरुष की खलपुरुष ?

तो पोलादी पडदा आणि पडद्याआडची कारस्थाने
तो भीषण संहार
त्याचबरोबर एका बलाढ्य राष्ट्राची पायाभरणीपण...
या प्रचंड राष्ट्राचा तो महापराक्रमी युद्धनेता
त्याच्याही शवपेटिकेची ती दुर्दशा --एका प्रदीर्घ लेखमालेचा विषय

# जेव्हा लाल होते

**लेखक ...............? आरंभ ...............?**

त्यांच्याजवळ वाहन नव्हते, काही नव्हते. मिसेस जिल यांनी ठरविले, बस्स् दुष्काळाचे संकट जाईपर्यंत आपल्या स्टेशनवॅगनसकट सारी शक्ती दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी ओतायची.

गयेला जिलबाईंनी आपल्या काही मित्रांजवळून मदतीसाठी जमविलेली औषधे घेतली आणि डॉक्टर तिवारी यांना घेतले. बोध गया पार करून वाळवंटी फाल्गू नदी ओलांडून स्टेशनवॅगन वेडावाकडा अवघड रस्ता कवाई गावाच्या दिशेने काटू लागली. डॉक्टरसाहेबांचे " व्हेन आय वॉज इन इंग्लंड..." तर जिलबाईंचे " काय काय करावं बरं, कुठला उपाय असेल या संकटावर ? कुठे चूक आहे ? " हे पालुपद चालू होते. आणखी एक-दोन कोरड्या नद्या पार झाल्या. वाटेवरील जमीन वैराण. मधूनच जिथे गावाच्या आसपास विहिरी खोल होत्या तिथे वीतभर उंच वाढलेली गव्हाची हिरवी पिके दिसत होती. पण ते नुसते तुकडे. बाकी सारे दृश्य होते वैराण भुरकट जमिनीचे, पर्णहीन वृक्षांच्या जंगलांचे, खुरटलेल्या खेड्यांचे ! धूळ उडवीत स्टेशनवॅगन खेड्याच्या वेशीपाशी आली की स्त्री-पुरुष, लहान मुले मागे धावू लागत. " अनाज नहीं सरकार, गल्ला अभी आया नहीं." (धान्य नाही—रेशन अजून आले नाही) असे दीनवाणेपणाने ओरडत. फाटके पदर पसरून बाया म्हणत, "लाज झाकायला तरी साडी द्या." दुष्काळामुळे त्यांना भीक मागायलाही कमीपणा वाटत नव्हता. डॉक्टरसारखे कुणी गाडीत आहे असे वाटताच लोक ओरडत, " डॉक्टरसाहेब, आजार फार वाढले आहेत गावात भुकेमुळे. "

## कवाई खुर्द केंद्रावर

कवाई खुर्द या गावी आम्ही पोचलो तेव्हा तिथे एकच गडबड उडाली होती. ऑक्सफार्म (ऑक्स्फोर्ड असोसिएशन फॉर फेमिन रिलीफ) या संस्थेतर्फे आलेले दूध आणि सातू रिलीफ कमिटीचे स्वयंसेवक या गावी भुकेलेल्या दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी रोज एकेक वाटी वाटतात. सातू फारच थोडे आणि लहान मुलांना पुरेल एवढेच असतात. पण तेवढ्यावरही संपूर्ण कुटुंबे दिवस काढतात. सातू मिळतात असे ऐकून दूरदूरची भुकेली बाया-मुले या केंद्रावर येतात. त्या दिवशी अशीच सहा मैलांवरील बांदा गावची एक भुकेली बाई सलीमबी खातून सातू मिळतील या आशेने रस्ता तुडवीत आली होती. केंद्रापासून फर्लांगभर अंतरावर अशक्तपणाने बेशुद्ध होऊन ती खाली पडली. केंद्रावर काम करणारे स्टीव्ह मॅन्कीन (समन्वय आश्रमात भूदानाचे संशोधन करण्यासाठी आलेले फुलब्राईट स्कॉलर) आणि मोहन (गुजरातेतून आलेला स्वयंसेवक) यांनी त्या बाईला उचलून आणले. आम्ही गेलो तेव्हा ती निपचित पडली होती. डॉक्टरांनी तपासले. निदान : उपासमार. एक इंजेक्शन दिल्यावर ती शुद्धीवर आली. आणि दूध प्यायला मिळाल्यावर थोड्या वेळाने तिला थोडीफार हालचाल करता येऊ लागली.

जिलबाईंनी डॉक्टरांना मुद्दाम बोलवून आणले होते. कवाई खुर्द आणि आस-

पासच्या गावांत आजार फार वाढले होते. केंद्राच्या अंगणात जमलेली एकही खडूत व्यक्ती निरोगी दिसत नव्हती. उपासमारीमळे साऱ्यांचे अस्थिपंजर झालेले. डोकी आणि पोटे मोठी असलेली मुले. त्यांना धड चालता येत नव्हते. रिलीफ सेंटरचे लोक म्हणाले, " आम्ही आलो तेव्हा त्यांना हालचालही करता येत नव्हती. आता त्यांच्या पोटात दुधाचे थेंब जातात तरी! " डॉक्टरांनी मुलामाणसांना तपासणे सुरू केले. प्रत्येकाला काही ना काही रोग आहेतच.

कवाई खुर्द या छोट्याशा गावची वस्ती अवघी १५०. पण कवाई म्हटले की आजूबाजूची बरीच गावठाणे त्यात येतात. गावातल्या अर्ध्या माणसांकडे दोन-दोन तीन-तीन बिघे जमिनीचे तुकडे. बाकीचे मजूर. यंदा अक्षरशः काहीच पिकले नसल्याने सगळ्यांच्या घरी ठणठणाट. अगदी जवळपास कुठले दुष्काळी कामही नाही. ज्यांचे नातेवाईक दूरच्या शहरांत कामे करतात त्यांच्या पैशांवर रेशन खरेदी करून ते जगताहेत. ज्यांचे कुणीच बाहेर नोकरी करीत नाहीत ते उपाशी राहत आहेत. केंद्रावर मुलांना आणि म्हाताऱ्या स्त्रियांना मिळणारे सातू वाटून खात आहेत. गावातील एकाही विहिरीला पाणी नाही. दोन मैलांवरून पाणी आणावे लागते. केंद्राच्या कार्यकर्त्यांना कपडे धुण्यालाही चार-पाच मैल जावे लागते. रोज तीन-चार गुरं तरी चाऱ्याविना तडफडून मरतात. रिलीफ केंद्र ज्यांच्या घरात चालते त्या श्री. गौरी शंकर यादव यांच्या घरातील आठ म्हशी गेल्याच आठवड्यात मेल्या होत्या. अस्थिपंजर झालेली तर कित्येक गुरे अशक्तपणे हालचाल करताना दिसत होती. रस्त्यात शेवटचे आचके देत असलेला बैल दिसला होता.



जागोजाग दिसणारे भयानक दृश्य

रिलीफ केंद्रावरील सातूचे प्रमाण ठरलेले आहे. केंद्राच्या यादीत नाव घालावे म्हणून दूरदुरून बायामाणसे आली होती. "गल्ला नहीं मिलता सरकार— सत्तू दो—" अशा विनवण्या करीत होती. आपापल्या गावांतल्या उपासमारीच्या कथा सांगत होती. कवाईपासून दोनच मैलांवर असलेल्या बाराखार या गावातील तुलवा, घवला हे दोन म्हातारे, मैनीबाई नावाची बाई आणि बलदेव नावाचा मुलगा उपासमारीने मेल्याचे काही लोक सांगत होते.

## स्टीव्ह मॅन्कीनची डायरी

रिलीफ केंद्रावरच्या स्टीव्ह मॅन्कीनला मी विचारलं, "मूकबळी पडताहेत हे खरं आहे का ?" स्टीव्हने काही न बोलता स्वतःची डायरीच आणून दाखविली. कवाईपासून सहा मैलांवर असलेल्या मसौंधी या खेड्यात उपासमारीने सात मुले मेली होती. स्टीव्ह आणि त्याच्या सहकाऱ्यांनी तिथे जाऊन खात्री करून घेतली होती. आणि एक अर्ज तयार केला होता. त्या नावांची यादी आणि अर्ज डायरीत होता. स्टीव्ह म्हणाला, "मसौंधीला आम्ही गेलो म्हणून हे आम्हांला कळलं. आड-वाटांना जिथे कुणी सहसा जात नाहीत अशी कितीतरी खेडी आसपास आहेत, तिथल्या मृत्यूचा आकडा कोण सांगणार ?"

मसौंधीमधील २५ घरांची वस्ती आहे. गावात विहीर एकच. तिचं पाणी सुक-लेलं. कुणाच्या घरात अन्नाचा दाणा नाही. जवळ कोणतंही मदत केंद्र नाही की सर-कारी काम नाही. लोक गाव सोडून चालले आहेत. बांदा गाव आपल्या मुलाबाळां-सह सोडून आलेली म्हातारी महबूदा म्हणाली, "घरी खायला काही नाही बाबूजी. तिथं मरण्यापेक्षा इथे येऊन सर्वांसमोर मेलेलं काय वाईट ! काही खायला तरी मिळेल म्हणून गाव सोडलं."

काही गावठाणांमधून घट्टेकट्टे स्त्रीपुरुष नोकरी मजुरी शोधण्यासाठी दूरदूर निघून गेले त्यांचा पत्ता नाही. बायकामुलं इकडे तडफडत आहेत. चिठ्ठ्या नाहीत की पैसे नाहीत.

केंद्राच्या बाजूला असलेली विहीर सुकली होती. ती अधिक खोल करण्याचे काम चालू होते. विहीर पाहण्यासाठी आलो तेव्हा संध्याकाळ होत आली होती. बाजू-लाच कुठल्यातरी झाडांची पूर्वी गर्द राई असावी. पण आता त्या झाडांच्या निष्पर्ण वाळक्या फांद्या तेवढ्या सांगाड्यासारख्या दिसत होत्या. एखादी जुनी स्मशानभूमी उकरून काढल्यावर सगळीकडे हाडांचे सापळे विखुरलेले दिसावेत तसे दिसत होते.

संध्याकाळी आम्ही बोध गयेला परतलो.

परतण्यापूर्वी वाटेत एका ठिकाणी थांबलो. रस्त्यापासून सुमारे मैलभर दूर अस-लेल्या एका खेड्यात कुणी म्हातारा अस्वस्थ असल्याची बातमी होती. तिथे जायचे होते. शेते तुडवीत, एक नाला ओलांडून आम्ही अगदी त्या खेड्यात जाऊन पोचलो तोवर एकही घर दिसत नव्हते, इतका अंधार पडला होता. एकाही घरात दिवा किंवा चूल पेटली नव्हती. धूर निघत नव्हता. सगळीकडे भयाण स्तब्धता होती. फक्त एका झोपडीतून कण्हल्याचा क्षीण स्वर येत होता. आत गेलो तेव्हा एका तुटक्या जीर्ण खाटेवर एक अस्थिपंजर झालेला म्हातारा पडला होता. अंगावर खरोखरच चिंध्या असलेली वस्त्रे. अंथरायला काही नाही आणि थंडीसाठी अंगावर घ्यायला चिरगुटंही नाहीत. घरात बाकी काहीच सामान नव्हतं. एक-दोन रिकामी

मातीची गाडगी. दिवा पेटवायला रॉकेलही नव्हते. डॉक्टरांनी विजेरीचा झोत टाकला तेव्हा आत प्रकाश आला. म्हाताऱ्याकडे पाहवत नव्हतं आणि त्याचं कण्हणं ऐकवत नव्हतं म्हणून मी चटकन बाहेर आलो.

त्या खेड्याचं नाव बेला. अवघी पंचवीस घरांची वस्ती. पण कुणाच्याही घरी जमीन नाही. सारे बेकार शेतमजूर. आजूबाजूची काही शेते विहिरीमुळे हिरवीगार होती; पण ती त्यांची नव्हती. झोपड्या सगळ्या जीर्ण झालेल्या. दरसाल पावसाळी पिकांची मजुरी मिळाली की छपरावरचे गवत बदलले जात असे. कुडाच्या भिंतीची तात्पुरती डागडुजी होत असे. पण गेली तीन-चार वर्षे अगदीच कोरडी गेली. छप्पर अगदी जीर्ण झालेलं आहे. ऊनही पुरेसं झाकलं जात नाही. पावसाळ्यात काय होणार ?

बाहेर आलो तो हाडांचा एक पिंजरा–फाटकी तुटकी वस्त्रे घातलेला, श्वास टाकत असलेला असा–अंगणात बसलेला होता. म्हाताऱ्याचा तो मुलगा होता. अंधारामुळे आणि त्याच्या प्रकृतीमुळे त्याचं वय कळत नव्हतं, पण असेल तीसएक वर्षांचा. नाव करूआ. "खायला काय मिळतं?" असं मी विचारलं तेव्हा मुठीतील एक वस्तू त्यानं माझ्यासमोर धरली. विजेरीचा उजेड टाकला तेव्हा काळसर रंगाचे, कुठल्यातरी वनस्पतीचे चौकोनी दमट तुकडे दिसले. तोंडात टाकले तो घरवेनात. मग कळलं शिवरीच्या फुलांचे ते तुकडे आहेत. आसपास खाण्यासारखं दुसरं काहीच नाही. शिवरीची फुलं तोडून आणून त्याचेच तुकडे हे लोक उकडतात आणि वाळवून खातात. " गेल्या महिनाभरापासून हेच खातो आहे बाबूजी. आता अंगात प्राण धरत नाही ". करूआ कसाबसा म्हणाला.

करूआ आणि त्याचा म्हातारा अद्याप जिवंत होता. पण त्यांचे हाल पाहायला करूआचा धाकटा भाऊ मथुरा हा मात्र शिल्लक उरला नव्हता दहा-बारा दिवसांपूर्वीच तो अन्नावाचून तडफडून मेला होता. अर्धनग्न अवस्थेतील करूआ भिंतीला टेकून आकाशाकडे नजर लावून श्वास टाकत बसला होता. कृष्णपक्ष असल्याने आकाश चांदण्यांनी फुलून आले होते. हजारो वर्षांपूर्वी दुष्काळाने नाडलेला मानव असाच अर्धनग्न अवस्थेत असहायपणे मातीच्या भिंतीला टेकून बसला असेल. एवढ्या अवधीत त्याने काहीच प्रगती केली नाही ? मग कुठे चुकते आहे ? यावर उपाय काय ? विचारांची तंद्री लागली होती. एवढ्यात जोराचा आवाज करीत एक विमान अगदी जवळून उडत गेले आणि तंद्री भंगली. गयेचा विमानतळ जवळच आहे.

बाहेर आल्यावर मान हलवीत डॉक्टर म्हणाले, "स्टार्व्हेशन— होपलेस— स्टार्व्हेशन— ", " काही कळत नाही... "

झोपडीच्या अंगणातच कशावरून तरी डॉ. तिवारी आणि स्टीव्ह यांचे एकदम भांडण जुंपले. डॉ. तिवारी चिडून दुःखाने म्हणत होते, "हा आमच्या बिहारी

शेतकऱ्याचा जन्मजात दोषच आहे. लेकाचे एक नंबरचे आळशी. कधी काम करणार नाहीत. एक वेळेपुरते मिळाले की दुसऱ्या वेळेसाठी काम करणार नाहीत. आता जिवावर बेतते तेव्हादेखील कष्ट करण्याची बुद्धी नाही."

## विद्यार्थी व दुष्काळ निवारण

बिहारवर कोसळलेल्या संकटावर कोणताही एक नेमका इलाज नाही. कोणतीही एक संस्था किंवा एक सरकार बिहार राज्यावर येत असलेल्या या संकटाची लाट थोपवू शकणार नाही. संकटाची भीषणता कमीत कमी करण्यासाठी सर्वांनी मिळून मिळेल त्या साधनांनिशी जोराचे प्रयत्न करणे हाच एक उपाय आहे. आणि त्यासाठी स्वयंसेवक कार्यकर्त्यांची बिहारमध्ये अत्यंत आवश्यकता आहे.

दुर्दैवाने बिहारची जनता अशी अडचणीत सापडली असताना बिहारी विद्यार्थी मात्र दुष्काळग्रस्त साहाय्यक कामांमध्ये जवळ जवळ मुळीच भाग घेत नाही. याला कारणे अनेक. विद्यार्थी या कामांमध्ये का भाग घेत नाही, असे मी विचारले की, लोक विद्यार्थ्यांच्या नावाने खडे फोडू लागतात! पण मला वाटतात ती कारणे अशी: गेले तीन-चार महिने बिहारमधील शैक्षणिक जीवनच स्थगित झाले होते. वातावरण अस्थिर झाले होते. शाळा-कॉलेजेस एक मार्चपर्यंत बंद होती; त्यामुळे विद्यार्थी संघटित होऊ शकले नाहीत. आता दुष्काळाचे स्वरूप तीव्र होत आहे, तेव्हा विद्यार्थ्यांच्या परीक्षा व्हायच्या आहेत. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत परीक्षाच आटोपणार नाहीत. त्यामुळे मदतकार्यामध्ये तळमळीच्या तरुण कार्यकर्त्यांची मोठी उणीव आहे. रिलीफ कमिटीला कार्यकर्त्यांची फार गरज आहे.

ज्या तरुणांच्या संघटनांना आपणहून कामे करायची आहेत त्यांच्यासाठी पुढील प्रकारची कामे आहेत.

१. पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या विहिरी खोल करणे. जरूर असल्यास बोअरिंग मशीनच्या साहाय्याने नव्या कच्च्या विहिरी खोदणे. या विहिरींचा पुढे भूसिंचनासाठीदेखील उपयोग होऊ शकतो. बिहारात विहीर खोदण्याचे काम महाराष्ट्रात आहे तेवढे कठीण नाही. सुमारे एक हजार रुपयांत एक विहीर खणून होते. संघटनांनी फंड जमा करून स्वतःचे बोअरिंग मशीन आणले तर उत्तमच. विद्यार्थ्यांच्या उन्हाळ्याच्या सुटीत हे काम होण्यासारखे आहे.

२. मोफत अन्नगृहे चालविणे. हे काम अत्यंत महत्त्वाचे आणि मोठे आहे.

स्टीव्ह म्हणत होता, "माझा अनुभव वेगळा आहे. बिहारी शेतकरी चांगला कामसू आणि कष्टाळू आहे. त्याला काम दिले की तो काम करतो." भांडणामध्ये मला ओढण्याचा प्रयत्न झाला. पण मला काहीच माहिती नव्हती.

## अपेक्षा आणि सूचना

ज्यांना हे काम करायचे आहे त्यांनी येत्या सप्टेंबरपर्यंत बिहारात राहावयाची तयारी ठेवली पाहिजे. ५०० लोकांना मुक्त मर्यादित भोजन मिळेल, असे भोजनगृह महिनाभर चालविण्यास सुमारे साडेतीन ते चार हजार रुपये लागतात. त्या प्रमाणात आठ महिन्यांसाठी फंड गोळा करून, त्याचे धान्य घेऊन ते इकडे आणून एखाद्या संघटनेला एवढ्या लोकांना जीवदान देता येईल. एवढे करण्याची तयारी असली तर नेमके कोठे जेवणघर चालवायचे, त्यासाठी काय करायचे, याचे मार्गदर्शन श्री द्वारकोजी, श्री. जयप्रकाश आणि ठिकठिकाणचे जिल्हा रिलीफ कमिटीचे कार्यकर्ते देऊ शकतील.

३. कपडे वाटणे. अन्न महत्त्वाचे असले तरी तेथील लोकांना अंगावर धड कपडेही नाहीत. स्त्रियांच्या साड्या-ब्लाऊज आणि लहान मुलांच्या शर्ट, चड्ड्या यांची जादा गरज आहे. असे कपडे जमा करून ते इकडे रिलीफ कमिटीला पाठविण्यापेक्षा दोघा-तिघांनी स्वतःच इकडे येऊन स्वहस्ते वाटप करणेच इष्ट. हे काम लौकरही होऊ शकते.

एकदा प्रत्यक्ष परिस्थिती पाहिल्यानंतर ज्यांना कामे करायची आहेत, अशांसाठी पुष्कळ कामे आहेत. समन्वय आश्रम, बोध गया, येथील एक जुने गांधीवादी कार्यकर्ते श्री. जेठालालजी संपट हेही या बाबतीत चांगले मार्गदर्शन करू शकतील. श्री. जेठालाल यांनी कच्च्या विहिरी सोप्या रीतीने, कमी खर्चात पक्क्या करण्यासाठी एक नवीन पद्धतीची वीट बनविली आहे, झोपड्यांसाठी नव्या पद्धतीची स्वस्त कौले बनविली आहेत. ते म्हणतात, "मला कार्यकर्ते हवेत. मी शेकडो कार्यकर्त्यांना इथे काम देऊ शकतो."

येऊ इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांनी ज्या गोष्टी नीट ध्यानात ठेवायच्या त्या पुन्हा नमूद करतो. १. हवामान सोसण्याची तयारी. काही दिवसांत इथले तपमान १२० अंश फॅरेनहीटपर्यंत जाऊ लागेल आणि लू वाहू लागेल.

२. जाण्यायेण्याचा खर्च स्वतःचा.

३. येईल त्या परिस्थितीत पडेल ते काम करण्याची तयारी.

४. रिलीफ सोसायटीवर स्वतःचा कमीत कमी खर्च पडू देण्याची दक्षता.

दुसरे दिवशी मी श्री. द्वारकोजींना विचारले तेव्हा ते म्हणाले, "दोघांचेही थोडे थोडे बरोबर आहे. प्रश्न वाटतो तेवढा सोपा नाही. बिहारात जाती खूप आहेत. शेतकऱ्यांमध्ये कुंजियार व कोरियार या खालच्या जाती अतिशय कष्टाळू आहेत. कुंजियार ही मुस्लिम शेतकऱ्याची जात आणि कोरियार हे हिंदू. हे लोक खालच्या जातीचे असले तरी तुम्हांला त्यांची घरे चांगली दिसतील. कारण ते आपणहून कष्ट करीत असतात. शेतात विहिरी खोदून रबीचे पीक काढतात. सुखात मिळेल तेवढ्या-वर कसेबसे पोट भागवावे अशी त्यांची वृत्ती नाही.

याउलट वरच्या जाती आहेत. उच्चपणाच्या भावनेमुळे म्हणा की आळसाने म्हणा हे राजपूत, भूमिहार वगैरे जाती कधीच विशेष कष्ट घेत नाहीत. इतरही खालच्या जाती अशाच आळशी आहेत." दुसरे दिवशी आणखी काही माहिती प्रत्यक्षच कळली.

करूआच्या झोपडीवरून आम्ही परत मैलभराची शेती तुडवीत रस्त्यावर आलो तेव्हा जिलबाई स्टेशनवॅगनमध्ये वाट पाहत होत्या. पुन्हा दोन दिवसांनी आणखी औषधांसह कवाईमध्ये येण्याचे स्टीव्हने जिलबाईंकडून आश्वासन घेतले आणि निरोप घेऊन त्या अंधारात गावी जाण्याचा रस्ता आपल्या सोबत्यांसह शोधू लागला. जिलबाईंनी मोटार हाणली.

बोध गयेला पोचल्यावर श्री. द्वारकोजींना भेटण्यासाठी डॉ. तिवारी समन्वय आश्रमात थोडा वेळ थांबण्यासाठी म्हणून आले. तासभर कडाक्याची चर्चा झाली. दुष्काळी मदतीची सरकारी कामे कशी आंधळेपणाने होतात, इलेक्शनपुढे सरकारचे दुष्काळी संकटाकडे कसे दुर्लक्ष झाले, दुष्काळी कामासाठी आता विहिरीच खोदा-यच्या आहेत तर केवळ पिण्याच्या पाण्यासाठीच का? एकदमच पाच-साडेपाच फूट व्यासाच्या विहिरी खणल्या तर त्यांचा सिंचाईसाठीसुद्धा उपयोग होणार नाही का? सरकारी मदतकामामध्ये भ्रष्टाचार कसा चालतो वगैरे.

मग माझ्याकडे वळून डॉ. तिवारी म्हणाले, "मला कळत नाही. तुम्ही वर्तमान-पत्रांचे लोक या सर्व गोष्टींसाठी जोराचा आवाज का उठवीत नाहीत? तुम्ही अगदी हलकल्लोळ माजवून दिला पाहिजे—अं?"

मी म्हणालो, "मलाही कळत नाही. पटन्यातली मोठी मोठी वृत्तपत्रे, इतर मोठी वर्तमानपत्रे इकडे डोळेझाक का करताहेत ते कळत नाही."

नंतर पुन्हा डॉक्टरांना पाच मैल गयेला पोचविण्यासाठी जिलबाईंनी गाडी हाकली. येताना त्या सारख्या पुटपुटत होत्या, "खरंच काही कळत नाही काय होणार ते—" ◻

# बोध गया मार्च ७-८

"भाई मर गया साहब, अब दफन को भी कपडा नहीं है."

एक शेतकरी अगदी दीनवाण्या स्वरांत सांगत होता. त्याच्या अंगावर एक बारीकशी लंगोटी होती. खरोखरच त्याच्या घरी दफनासाठीही कपडा नाही, हे स्पष्ट दिसत होते. श्री. द्वारकोजींनी कपाळावर हात मारला. काल उपासमारीमुळे काही लोक अत्यवस्थ झाल्याची बातमी आली होती ती याच देहदारी गावची. काल सकाळीच द्वारकोजी आणि इतर लोक इकडे आले होते. दोघेजण भुकेने मरणाच्या दारात पडले होते. त्यांना तावडतोब उपचार करून अन्न-दूध देण्यात आले होते; पण आज सकाळीच त्यांच्यापैकी एकजण मेला होता.



अनाज नहीं, पानी नहीं हुजूर...

देहदारी हे बोध गयेपासून १५-१६ मैलांवर असलेले सुमारे १३० घरांचे गाव. गावात कुणाच्याच घरी पीक झाले नाही. जवळ कुठले मदत-केंद्रही नाही.


श्री. द्वारकोजींनी त्या माणसाची काहीतरी सोय केली. मायकेल नावाचा 'ब्रदर्स ऑफ इंडिया सोसायटी' चा एक सदस्य आमच्याबरोबर होता. विहीर खणण्यासाठी तो आपले सामान आणि खोदण्याची उपकरणे घेऊन तिथेच उतरला. त्याच्याबरोबर आश्रमाचा मोहन नावाचा आणखी एक स्वयंसेवक उतरला आणि गाडी सुरू झाली.

बोधगयेच्या दक्षिणेला आम्ही बाराचट्टी विभागात जिलबाईंच्या स्टेशनवॅगनमधून हिंडत होतो. मदतकार्य मुळीच न पोचलेल्या गावांची पाहणी करायची होती आणि नव्या विहिरी कुठे खोदता येतील, जुन्या विहिरी कुठे खोल करता येतील, कुणाला विहिरींची अधिक आवश्यकता आहे. आवश्यकता सर्वांनाच आहे– म्हणून विहीर दिल्यास त्यावर काम करण्याची कुणाची तयारी आहे याची पाहणी द्वारकोजींना करायची होती. आमच्याबरोबर डेव्हिड मोलो हाही एक ब्रिटिश इंजिनियर स्वयंसेवक होता. विहिरींसंबंधी, विहिरी खोदण्याच्या यंत्रांविषयी त्याला बरीच माहिती होती. प्रवासाला सुरुवात झाली ती अशी :

बोध गयेहून सकाळी उठल्या-उठल्याच आम्ही निघालो होतो. वाटेत मुख्य रस्त्या-

वर बाराचट्टी या एका मध्यम गावापाशी आम्ही थांबलो. रस्त्याच्या बाजूलाच हिरवी हिरवीगार शेते होती. बाजूच्या वैराण मुलुखात ती खुलून दिसत होती. शेतामध्ये अंतरा-अंतरावर छोट्या छोट्या विहिरी होत्या. आणि स्त्री-पुरुष शेतकरी त्यांतून पाणी काढून ते पाटात ओतण्याचे काम करीत होते. विहिरींमधून पाणी काढण्याची फार सोपी पद्धत विहारी शेतकरी वापरतात. खिराडी वापरण्याऐवजी ते तरफ (लिव्हर) वापरतात. विहिरीच्या बाजूला ते झाडाच्या फांदीचा एक उभा फाटा रोवतात, फाट्यावर फिरू शकेल असे एक लांब निमुळते लाकूड टाकतात. या लांब फांदीचे विहिरीकडील टोक लांब असते आणि निमुळते होत गेलेले असते तर विरुद्ध बाजूकडचे टोक आखूड आणि जाड असते. या जाड आखूड टोकावर दगडांचे चांगले वजन बांधले जाते आणि विहिरीकडील टोकावर दोर आणि बादली. जडपणामुळ वजनाची बाजू नेहमी खाली असते. आणि तरफेच्या तत्त्वामुळे दोर नुसता खाली ओढला तरी थोड्याशा जोराने वजन वर उचलले जाऊन बादली पाण्यात जाते आणि दोर सोडला की वजन एकदम खाली जाऊन पाण्याने भरलेली बादली आपोआप वर येते. दोर खाली ओढण्यात जी मामुली ताकद लागेल तेवढीच खर्च होते. विहीर जेवढी खोल असेल तेवढ्या प्रमाणात वांबूची लांबी ठेवावी लागते. बिहारात विहिरींना पाणी फार जवळ लागते. पाणी उपसण्याच्या या पद्धतीला ' लाठा चालविण ' म्हणतात. कष्टाळू शेतकरी रबीचे पीक चांगले काढण्यासाठी सतत असे लाठे चालवीत असतात.

रस्त्याने जाऊ लागले की, वैराण भागात मधूनच एखादा हिरवा तुकडा दिसतो



' लाठा चालवताना '

आणि त्यामध्ये स्त्री-पुरुष भराभरा लाठे चालवीत असलेले दिसतात. शेतांमधील गव्हाचे पीक दीड-दीड वीत वर आलेले दिसते.

## कुंजियार आणि कोरियार

हेच लोक तेवढे 'लाठे' चालवून रबी पीक काढताहेत. मग इतर का नाही काढीत ? मी चौकशी केली तेव्हा कळले की, हेच ते कुंजियार आणि कोरियार लोक. त्यांनी आपणहून आपल्या विहिरी खोल करून घेतल्या आहेत. रबीचे पीक तेच मोठ्या इमानदारीने आणि मेहनतीने काढतात. ज्यांच्या विहिरींना अजून पाणी आहे ते हे पीक काढताहेत. इतरांच्या विहिरींना नाही. पण एरवी विहिरींना पाणी असूनही सारेच लोक रबी पीक काढतातच असे नाही. बरेच लोक आळसामुळे भर हिवाळ्यात चांगली जमीन तशीच पडू देतात. बिहारात सुमारे पावणेतीन कोटी एकरांत शेती होते. त्यांपैकी ५०–६० लाख एकरांतही रबीचा गहू काढला जात नाही. भात शेतीपैकी अर्धीतरी जमीन हिवाळ्यात लायक असते; पण आळसामुळे ती उपयोगात येत नाही.

आता या वेळेस बऱ्याच विहिरी कोरड्या झाल्या आहेत, त्यामुळे या प्रमाणात आणखी घट झाली आहे, शिवाय गव्हाचे जे पीक वर आले आहे तेही सर्व टिकेल की नाही याची शाश्वती नाही; कारण विहिरीमधील पाणी आणखीच खाली जात आहे आणि पश्चिमेकडून फेब्रुवारीपासूनच धुळीचे वारे येत आहेत. पिकांना त्यांचा फार मोठा धोका आहे.

वाराचट्टीहून मुक्काम हलवला. मुख्य रस्ता सोडून आम्ही आडरस्त्याला लागलो. गाडी वळणे घेत गचके खाऊ लागली. पुन्हा तीच दृश्ये. " बच्चे मर रहे हैं हुजूर, अनाज नहीं, पानी नहीं." माणसे मागे लागताहेत.

कान्हूदाग नावाच्या खेड्यात आम्ही थोडा वेळ उतरलो. वीस-पंचवीस झोपड्यांचे गाव होते. गावात एक विलक्षणच दृश्य दिसले. तरुण स्त्री-पुरुष बेकार होते. काम नाही म्हणून घरातच होते. अन्न नाही. खायचे काय ? सारे अस्थिपंजर झालेले होते. एक–दोन ठिकाणी तसे मला दिसले. हातात कसलेसे फळ घेऊन त्याची टरफले फोडून आतील चिकट भाग लोक खात होते. तोंडातून आणि त्या फळातून तारा निघत होत्या. तोंड आणि हात चिकट घाणेरडे होत होते. तरी त्यांना त्याचे भान नव्हते. डोळ्यांत काही ताकद दिसत नव्हती. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याइतपत शुद्ध नव्हती. काही विचारले की वेड्यासारखे रिकाम्या नजरेने ते बघत. ते खात होते ते बेलफळ होते. गावात प्रत्येक अंगणात ती टरफले पडली होती. बीफन मुईयाँ नावाचा माणूस म्हणाला, " हेच खाऊन आता आम्ही जगतो आहोत बाबूजी."

परंतु त्या बेलफळांचा उपयोग फक्त पोट भरण्यापुरता नव्हता. ते लोक ते फळ भाजून खात होते. भाजून हे फळ खाल्ले की अंगातील सारी ताकद नाहीशी होते आणि माणूस निपचित पडून राहतो. त्याला कशाची शुद्ध राहत नाही. हे

लोक असेच करतात. बेलफळे आणून ठेवतात. सकाळी उठून भाजून ती खातात आणि दुसरे दिवशी सकाळपर्यंत निपचित पडून राहतात. पुन्हा दुसरे दिवशी तशीच फळे खातात.

आश्चर्य, उद्वेग, संताप, दुःख, कींव या भावनांची एकदम गर्दी झाली. हे लोक एवढ्या मख्खपणे, मूकपणे, असहायपणे आपणहून मृत्यूला का म्हणून कवटाळताहेत? झगडण्याची, कष्ट करून पोट भरण्याची, जिवंत राहण्याची ईर्ष्या त्यांच्यांत का नाही? पशूदेखील मरणापूर्वी धडपड करतात. मग हे लोक एखाद्या तत्त्ववेत्त्या प्रमाणे मोठ्या शांतपणे आपणहून आत्मघात का करून घेत आहेत? मी पाहिलेल्यांपैकी बहुतेक लोकांची मागणी आहे, "धान्य द्या. आम्हांला वाचवा." पण "काम नाही, काम द्या. आणि मजुरीच्या बदल्यात धान्य द्या," असे कुणी म्हणत नाही. दुष्काळी काम गावाजवळ काढण्यापेक्षा मुफ्त जेवणघर गावात निघालेले बरे, असे त्यांना वाटते. "विहिरी खोदणार आहोत, काम मिळेल आणि धान्यही मिळेल" असे सांगितले की, लोक माना टाकीत म्हणत, "पाणी लागायला हवे ना विहिरींना?"

बिहारात भुईयाँ जातीचे हरिजन मजूर अतिशय आळशी मानले जातात. पोटाला चिमटा पडेपर्यंत ते काम करीत नाहीत. दिवसातून एक वेळ थोडेसे पोटभर पाहिजेच असे नाही. खायला मिळाले की मग कामाचे नाव नको. काही प्रगती करण्याची हावच नाही. आपली परिस्थिती सुधारण्याची इच्छाच नाही. असा आळस आणि त्यापोटी निर्माण झालेली ही जीवघेणी अल्पसंतुष्टता! कसं होणार? खरंच कसं होणार काही कळत नाही! जिलबाईंबरोबर आता मीही मान हलवू लागलो होतो. द्वारकोजी म्हणत होते, "काम करण्याची ज्यांची तयारी आहे त्यांच्यासाठी काहीतरी करावंसं वाटतं. नुसतीच भिक्षा वाटण्यात काय अर्थ?"

वाटेत तुलचाक नावाचे एक गाव लागले. तिथले लोक मात्र उद्योगी दिसले. शेजारच्या घरघरी नावाच्या सुकलेल्या नदीतील उरले सुरले पाणी शेतीसाठी वापरण्याचा प्रयत्न त्यांनी चालविला होता. त्यासाठी त्यांनी सोपी पद्धत वापरली होती. नदीच्या कडेला एक विहीर खोदून तिथे एक लाठा लावला होता. त्या लाठ्यातून निघणारे पाणी सांडव्यातून पुढे नेले होते. शेते बरीच उंचावर होती, त्यामुळे सांडव्यातून सरळ पाणी जाणे शक्य नव्हते; त्यामुळे त्यांनी कालव्यासारखे खोल सांडवे खणून दोन ठिकाणी आणखी उंचावर लाठे लावून पाणी वर ओढले होते. त्यांचा उद्योगीपणा पाहून बरे वाटले.

## हरिजनांची अवस्था

पुढे पकरीया ही भुईयांची वस्ती लागली. मोडकळीस आलेल्या झोपड्या. अंगावर पुरेशी वस्त्रे नाहीत म्हणून बाया बाहेर पडत नव्हत्या. मोठ्या डोक्यांची आणि फुगलेल्या पोटांची मुले अंगणात मख्खपणे बसून आहेत. साऱ्या गावाला स्मशानकळा पसरली आहे. "गरीब मर रहें हैं हुजूर," असे दिनवाण्या स्वरांत बापडे लोक ओरडताहेत.

पकरीया वस्तीवरील एकाही माणसाकडे स्वत:ची जमीन नाही. आजूबाजूची सर्व जमीन एका बड्या जमीनदाराकडे आहे. यंदा तिथे काही पिकले नाही. त्यामुळे या भुईयांना काहीच काम मिळाले नाही. आजूबाजूला खायला काही नाही, म्हणून एरंडीच्या बिया सुकवून ते खात आहेत. इथेही काहीजण बेलफळे खातात. घराघरांत आम्ही शिरलो. सर्व ठिकाणी ठणठणाट. काही काही ठिकाणी कुठल्यातरी काळ्या बिया उकडण्यासाठी ठेवल्या होत्या. त्या कसल्या होत्या कळले नाही. काही ठिकाणी मुलं शिवरीची कच्ची फुलं खात बसली होती.

एका खोपटात सुकन नावाची दहा-बारा वर्षांची मुलगी एकटीच बसली होती. अंगावर चिंध्या. पुन्हा पुन्हा विचारले, तेव्हा तिने एका गाडग्याच्या तळाशी ठेवलेल्या तुरीच्या सुकलेल्या मूठभर शेंगा दाखविल्या. सुकनच्या घरी एकूण माणसे नऊ. आई-बाप आणि सात मुले. बाप जंगलात मोळ्या गोळा करायला गेला होता. आई काही खाण्याची फुलं-फळं गोळा करायला गेली होती. दिवसभरात बाप जंगलातून मोळी जमा करतो आणि ती २ ते ३ आण्याला कॉन्ट्रॅक्टरला विकतो. तीच मोळी पुढे कॉन्ट्रॅक्टर १० ते १२ आण्यांना गावात विकतो. दिवसभराच्या तीन-चार आण्यांत साऱ्या ९ जणांनी गुजराण करावी. गावात रेशन येतच नाही. कारण रेशन विकत घेण्यासाठी पैसा हवा ना! या रेशनचे नेमके काय होते ते मला पुढे कळले.

जवळच कुंभी ही वस्ती होती. तिथेही परिस्थिती अशीच. इथले लोक दारू गाळण्यात पटाईत. पोटापुरते काम केले की लोक दारू पिऊन पडतात. इथे एक आणखी गोष्ट कळली संताप आणणारी.

आपल्या लहानशा शेतामध्ये एका हरिजनाने विहीर खणणे सुरू केले. जवळच्याच एका उच्चवर्णीय हिंदूची म्हैस चरण्यासाठी या हरिजनाच्या शेतात घुसली होती. चरता चरता ती या विहिरीच्या खड्ड्यात पडली आणि जखमी झाली. झाले! त्या उच्चवर्णीय हिंदूचे पित्त खवळले. हरिजनाच्या विहिरीत म्हैस पडून जखमी होते म्हणजे काय! त्याने लगेच पंच बोलावून त्या हरिजनावर आपली म्हैस जखमी केल्याचा दावा लावला. पंचही त्या उच्चवर्णीय हिंदूच्याच बाजूचे! त्यांनी त्या हरिजनाला म्हैस जखमी केल्याबद्दल १०० रुपये दंड ठोठावला. आणखी गोष्टीतील मुख्य भाग हा की त्या गरीब बिचाऱ्या हरिजनाने आपल्या घरातील किडुकमिडुक विकून कसेबसे कर्ज काढून तो दंड भरला!

ही घटना कुठल्या प्रचारकी कथेतील किंवा नाटकातील नव्हे किंवा मोगलकालीन वा ब्रिटिश काळातीलही नाही. ही आहे गेल्या नोव्हेंबरची गोष्ट. विहिरी खणण्यास बिहार सरकारने शेतकऱ्यांना उत्तेजन देण्यास नुकतीच सुरुवात केली, तेव्हाची गोष्ट. अनेक लोक या गोष्टीला साक्षी आहेत. स्वत: द्वारकोजीही साक्षी आहेत. "पण मग त्या हरिजनाने दंड का भरला! त्याचा काहीच गुन्हा नव्हता!

खरे म्हणजे त्या म्हशीच्या मालकाचाच गुन्हा होता, " मी संतापून म्हणालो. द्वार-कोजी हसून म्हणाले, " हे असेच आहे. ही खेडी आहेत, इथे बळी तो कान पिळी. "

आणि इथे अशा कितीतरी घटना घडतात. दुष्काळ असो की सुबत्ता असो; हा जातीयवाद काही जात नाही. भ्रष्टाचार काही संपत नाही. सरकारी अधिकाऱ्यांचे पैसे खाणे काही थांबत नाही ! इथे खेडयांमध्ये कोणत्याही अधिकाऱ्याकडून साध्या-सुध्या गोष्टी करून घेण्यासाठी पैसे लागतात. खरांटी गावचा बाबूलाल महतो हा एक कार्यकर्ता आपल्या गावात विहिरी खोल करण्याची दुष्काळी कामे सुरू करण्याचा केव्हापासून प्रयत्न करतो आहे. पण तो म्हणतो हात ओले केल्याशिवाय काम काही चालू होत नाही. इकडे गावातल्या विहिरी सुकल्या आहेत. लाच न देण्याचे कितीही ठरविले तरी त्याला शेवटी काही तरी करावे लागणारच आहे.

## निवडणुका आणि दुष्काळ

निवडणुकीच्या नावाने लोक खडे फोडताहेत; ' बैलजोडीपर मुहर लगाव, ' ' दियेपर मुहर लगाव, ' ' सैकलपर मुहर लगाव. ' अशी पत्रके अजूनही खेडयांतल्या मोडक्या तोडक्या भिंतींवर दिसतात. मुहर म्हणजे सिक्का. " हे ' मुहर लगाव ' सांगणारे आता धान्य आणि काम द्यायला येत नाहीत का ? " मी एकाला विचारले. तेव्हा तो संतापून म्हणाला, " काही विचारू नका. निवडणुकीच्या अगोदर लोक येत होते. ' धान्य देऊ, काम देऊ, ' असे आश्वासन देत होते. आता आम्ही मरतो आहोत, तेव्हा कुणी आमच्याकडे ढुंकूनही बघत नाहीत. "

आणि खरोखरच निवडणुकीअगोदर सगळी दुष्काळी कामे जोरात सुरू होत होती. सरकारी अधिकारी पैसे खाऊन का होईना कामांकडे लक्ष देत होते. आता या साऱ्या कामांची गती थंडावली आहे. समन्वय आश्रमाचे कार्यकर्ते श्री. जेठालालजी म्हणाले, " सरकारने सुरू केलेली दुष्काळी कामे निवडणुकीपर्यंत जोरात चालली. नंतरचे आतापर्यंतचे १५-२० दिवस सारी कामं थंडावलेलीच आहेत. अतिशय पक्षपातीपणाने ही कामे होत होती. " श्री. द्वारकोजीही म्हणत होते, " या निवडणुकीने लोकांना आंधळे केले आहे. "

पण हे विषयांतर झाले. हा भ्रष्टाचाराचा विषय अजूनही राखून ठेवीत आहे. गया जिल्ह्यातील नवादा विभागाच्या वार्तापत्रात या विषयावर आणखी माहिती देता येईल. कारण तिथेच मला पुष्कळ गोष्टी प्रत्यक्ष पाहायला मिळाल्या.

कुंभीहून आम्ही परतलो. आणखी काही खेडी पाहिली. जिथे तिथे हीच परिस्थिती ! लोक हळूहळू मरताहेत. वाटेल त्या हिरव्या वस्तू खाताहेत. लाचार बनत आहेत. कुठे काही फरक नाही ! जसजसे आणखी दूर जावे, शहरांपासून दूर जावे, जंगलांतील खेडयांमध्ये जावे, तसतशी परिस्थिती अधिक भीषण दिसते. एकेका खेडयात पाऊल टाकलं, की कच्च्या दिलाच्या माणसाच्या डोळयांत पाणी येतं. दुःख बघवत नाही. हाल पाहवत नाहीत. स्वतःचीही असहायता जाणवते !

द्वारकोजी आणि डेव्हिड यांची विहिरी बांधण्यासंबंधीची दिवसभराची पाहणी पूर्ण झाली होती. आणखी काही होणे शक्य नव्हते म्हणून आम्ही संध्याकाळीच बोध गयेला परतलो.


## जिलबाईंचा निरोप

दुसरे दिवशी गया स्टेशनवर पोचवताना जिलबाई मला म्हणाल्या, "तुम्हांला सापडलं का या सर्व प्रश्नांवरचं उत्तर ? खरोखर तुमचे सारे प्रश्न एवढे प्रचंड आणि एवढे विचित्र आहेत, की काही कळेनासं होतं ! काही काही अशा मूर्ख-पणाच्या गोष्टी होतात की, मती कुंठीत होते. अतिशय बेशिस्त, इच्छाशक्ती नस-लेल्या अशा लोकांच्या महासागरला तुम्हांला तोंड द्यायचं आहे. मी गेले काही दिवस विचार करते आहे. आणि मला तुमच्या सर्व प्रश्नांवर एकच उत्तम तोडगा दिसतो. तुम्हांला एक चांगला हिंदू धार्मिक नेता पाहिजे आहे."

"पण ते कसं शक्य आहे ? आम्ही हिंदू लोक एका कुणालाच संपूर्ण नेता मानीत नाहीत."

"मी तेच म्हणते. मी स्वत: प्रॉटेस्टंट ख्रिश्चन आहे. त्यामुळे मी विशेष धार्मिक नाही. कॅथॉलिक ख्रिश्चन प्रत्येक बाबतीत धार्मिक लुडबूड करतात, ते मला मुळीच आवडत नाही. पण त्यांचा मला फार हेवा वाटतो ! कारण त्यांची एकी आणि शिस्त. त्या सगळ्यांचा एकच नेता आहे पोप. त्याचे ते सारे काही मानतात. तसाच एखादा अतिशय लोकप्रिय नेता तुमच्या हिंदू धर्मात निर्माण व्हायला हवा. नेता असा हवा की तो जे सांगेल ते सारे लोक करतील. तो या सर्व गोष्टींना शिस्त लावू शकेल. शेतकऱ्यांना काम करण्याची सवय लावू शकेल. भूतदयेची सवय लावू शकेल. हाच एक उपाय आहे ! परंतु असा नेता मात्र तुमच्यातूनच निर्माण व्हायला हवा ! बाहेरून कुणी यायला नको." ●






# गमनात घुमविली जय गाथा

युद्धाच्या वार्ता कधी शिळ्या होत नसतात. प्रत्येक खेपेला त्यांच्या कथनात आणि श्रवणात नवनवी चित्तवेधकता आपोआप येत राहते. भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये वर्षापूर्वी झालेल्या युद्धाची आणि भारताने पाकिस्तानच्या घातकी आक्रमणाला खंबीरपणे प्रत्युत्तर देऊन प्रकट केलेल्या असामान्य शौर्य-धैर्याची कथा तर अजूनही प्रत्येक भारतीयाच्या मनाला अभिमानाने पुलकित करते. ज्या भू-भागावर हे युद्ध घडले ती आता भारतीयांना तीर्थक्षेत्रे झाली आहेत. त्यांचे दर्शन मनास स्फूर्ती, उत्साह, प्रेरणा निर्माण करण्यास समर्थ बनते. श्री. गो. नी. दांडेकर यांनी या साऱ्या तीर्थक्षेत्रांची यात्रा केली. तेथील माणसे पाहिली, त्यांच्याशी गुजगोष्टी केल्या. त्यांची सुख-दुःखे पाहिली. त्यांचे अनुभव आपलेसे केले. खूप पाहिले आणि अनुभवले !

# संवेदनाक्षम

# साहित्यिकाची

# युद्धक्षेत्रास भेट

**निशिकांत मिरजकर**

त्यांच्या साहित्यिक मानसाचे नवनीत द्रवले, पाझरले. जवानांच्या शौर्याचे व नागरिकांच्या धैर्याचे मनोरे त्यांनी जवळून पाहिले आणि 'गगनात घुमविली जयगाथा' हे पुस्तक निर्माण त्यातून झाले.

युद्धक्षेत्राची यात्रा करताना श्री. दांडेकरांनी आपल्या मुलीला लिहिलेली ही पत्रे आहेत. रोज येणारे नानाविध अनुभव, भेटणारे अनेक प्रकारचे लोक, काही पीडलेले, काही चिडलेले ! तथापि स्वाभिमानाने ताठ राहिलेले ! युद्धकाळातील त्यांच्या कथा आणि व्यथा त्यांनी या पत्रांमधून अगदी मोकळेपणाने सविस्तर लिहिल्या आहेत. एका संवेदनाक्षम, हळुवार भावनाशील मनाच्या लेखकावर युद्धाच्या विध्वंसाने आणि प्रतिकाराच्या जिद्दीने घडणाऱ्या परिणामांचे हे खरेखुरे आ-लेखन आहे. श्री. दांडेकरांना इतिहासाविषयी अपार प्रेम. मराठ्यांच्या इतिहासाशी संबंध असलेला प्रत्येक बुरूज त्यांनी स्पर्शिलेला आहे. हा तर घडणारा इतिहास. स्वतंत्र भारताच्या इतिहासातले ताजे सोनेरी पान. जवळून बारकाईने त्याला न्याहाळण्याची एकही संधी दांडेकरांनी सोडलेली नाही.

मात्र हा केवळ 'इतिहास' नाही. प्रस्तावनेत संरक्षणमंत्र्यांनी म्हटल्याप्रमाणे, "श्री. दांडेकर यांच्या भावक्षम मनावर जे बिंबले ते त्यांनी तळमळीने लिहिले आहे. अशा प्रतिबिंबात्मक स्वरूपाच्या लिखाणात प्रत्यक्ष घटनेच्या तपशीलापेक्षा त्या घटनेचे लेखकावर झालेले परिणामच अधिक हृदयंगम असतात." दांडेकरांच्या मनावरील हे हृदयंगम परिणाम त्यांनी तशाच हृदययंगमरीतीने येथे व्यक्त केले आहेत.

श्री. दांडेकरांची भाषाशैली नेहमीच घरगुती जिव्हाळ्याची असते. तशात या पुस्तकाचे स्वरूपच घरगुती पत्रांचे असल्याने ती आणखीच हळुवार बनते, जिवीचे हितगुज उलगडून दाखवते. भेटलेली माणसे आणि त्यांचे विचार यांच्याबरोबरच पाहिलेल्या दृश्यांमुळे आपल्या मनात उठणारे भावनांचे विविध तरंग दाखवू पाहते. अंबाल्याच्या हॉस्पिटलमधील जखमी जवान अनपेक्षितपणे मुलखातल्या या मराठी माणसाचे सौहार्द पाहून गहिवरतो, तेव्हा दांडेकर लिहितात–"आठवणी अनावर होऊन त्याच्या डोळ्यांतून घळघळा आसवे वाहू लागली. ते पृथ्वीमोलाचे पाणी धरित्रीवर सांडू लागले. घळघळा. मी ती आसवे माझ्या हातांनी पुसली बेटू ! या दिवाळीच्या दिवशी हे असे देवदुर्लभ स्नान घडले. सारे खळमळ त्या तीर्थात धुवून गेले. आता अपवित्र असे काही उरलेच नाही !" अशासारख्या वर्णनाने वाचकाला गहिवर न आला तर नवल. असे उत्कट प्रसंग सर्वत्र विखुरलेले आहेत. तोफेच्या गोळ्याने कर्नलच्या मस्तकाच्या चिंधड्या होऊन त्याच्या मेंदूचा चिखल भिंतीवर उडणे, गोठ्यातील गुरे बाँबहल्ल्यात तशीच राहून, कुजून, फुगणे यांसारख्या दृश्यांनी दांडेकरांच्या विह्वल मनात असंख्य पडसाद उठतात. भगतसिंगाची समाधी पाहून ते दिव्यत्वाने भारून जातात. प्रत्यक्ष लढाईच्या धुमश्चक्रीची वर्णने करताना त्यांच्या अंगी एखाद्या जवानाचाच आवेश संचरतो.

श्री. दांडेकर जवानांप्रमाणेच सामान्य नागरिकांतही सर्वत्र मिसळल्यामुळे युद्धाच्या रोमहर्षक कथा आणि नागरी जीवनाच्या विदारक व्यथा या दोहोंचेही दर्शन त्यांच्या लिखाणातून घडते. सूक्ष्म निरीक्षण आणि विपुल माहिती यांचा प्रत्यय तर प्रत्येक पत्रामध्ये येतो. आपल्या जवानांच्या शौर्यकथांची संपूर्ण जाणीव होण्यासाठी, नागरी आघाडीवरील मनोधैर्याचे आकलन होण्यासाठी ही 'जयगाथा' पूर्ण उपयोगी पडेल. एकच दोष जाणवतो. तो म्हणजे पाल्हाळ ! दांडेकर एकदा रंगले की, त्यांना ओळींचे भानच राहत नाही. पण हे त्यांचे नेहमीचेच आहे. शिवाय ही आहेत त्यांनी आपल्या मुलीला लिहिलेली पत्रे. त्यांचे मोजमाप कुणी करावे ? पाल्हाळ सोडला, तर मात्र सामान्य वाचकाला शेवटपर्यंत गुंगवून ठेवण्याचे आणि पर्यायाने त्याला आपल्या शूर जवानांशी जवळीक करून देण्याचे कसब मात्र दांडेकरांच्या या पुस्तकात निश्चित आहे.

**[ 'गगनात घुमविली जयगाथा'— गो. नी. दांडेकर :**
**मूल्य पाच रुपये : मॅजेस्टिक बुक स्टॉल : पृष्ठे १५१ ].**

## □ राष्ट्रधर्म – रोटी विशेषांक

लखनौ येथून प्रसिद्ध होणाऱ्या हिंदी मासिक 'राष्ट्रधर्म'चा फेब्रुवारी-मार्च हा संयुक्त अंक 'रोटी विशेषांका'च्या नावीन्यपूर्ण कल्पनेमुळे लक्ष वेधून घेतो. 'अन्नासाठी दाही दिशा' ही सध्याची परिस्थिती का निर्माण झाली, ती या आधीच कशी आटोक्यात आणता आली असती, याबाबत श्री. अच्युतानंद मिश्र, श्री.

नित्यानंद व श्री. विमलकुमार यांनी आकडेवारीच्या साहाय्यानं चांगलाच प्रकाश टाकला आहे. डॉ. प्रभाकर माचवे यांच्या लेखावरून रोटीसाठी लाचारी कशी वाढली आहे, याची त्रिसूत्री वाचल्यावर " आखिर हमें जीना है । नहीं तो रोटीपानी की व्यवस्था क्या होगी ? " हे सारे लक्षात येते. इतरही लेख ' रोटी ' संबंधीच्या भारताच्या ज्वलंत गरजेचा परिणामकारक आढावा घेण्यात यशस्वी झाले आहेत. ●

[ ' राष्ट्रधर्म ' मासिक : रोटी विशेषांक : लखनौ : मूल्य १–५० ]

## □ कोळी–जीवनातील चटकदार गोष्टी

कोळयांच्या विलक्षण जीवनात घडलेल्या आणि नेहमी घडणाऱ्या नऊ गोष्टी या पुस्तकात आहेत. कोळी लोकांचे जीवनच रोमहर्षकतेने नटलेले, अनिश्चिततेने भारलेले असते. प्रतिदिनी त्यांना काळाच्या उघड्या जबड्यातच वावरावे लागते. जीवनमरणाच्या लाटांवर लहरावे लागते. साहस आणि धैर्य हे त्यांचे दैनंदिन जीवनाचेच सूत्र असते. त्यामुळे नाट्यमयतेला त्यांच्या जीवनात भरपूर वाव असतो. या जीवननाट्यातील काही विशेष प्रसंग निवडून लेखकाने ते चटकदार शैलीने रसाळ भाषेत निवेदन केले आहेत. दिलेल्या शब्दासाठी प्राणपणाने साहसात उडी घेणारा सरळ मनाचा भाबडा कोळी आणि त्याला निष्ठेने साथ देणारी, धीट, निर्भय नि आपल्या शीलाला जपणारी त्याची सहचरी यांच्या स्वभावांची निर-निराळी अंगे या गोष्टींमधून दिसतात. कोळी जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण लेखकाने केलेले आहे याची सर्वत्र प्रचीती येते. कोळयाचा मचवा, मासेमारीची त्याची पद्धती, त्यात यणारी संकटे यांचे वर्णनाबरोबरच कोळयाचा दिलदार स्वभाव, उपकार-कर्त्याविषयी त्याच्या मनात असणारी पूज्य भावना आणि जिवाला जीव देणारा, पण अन्यायामुळे खवळून क्वचित जीव घेण्यासही उठणारा त्याचा साधा भाबडा स्वभाव यांचेही बारकावे ठिकठिकाणी दिसून येतात. सरळ मनाच्या कोळयाला फसवून दुष्टमती ' शेठ ' चोरट्या व्यापाराचे जाळे पसरतात आणि कधीतरी कस्टम अधि-काऱ्यांच्या हाती सापडतात. या साऱ्या घटना गोष्टींमध्ये अगदी रंगवून सांगितल्या आहेत, आणि त्या रंगतातही. दर्यावरील वातावरण स्पष्ट करणारे वर्णन आणि कोळयांच्या बोलीतले सहज संवाद यांची त्यासाठी चांगली मदत होते. फार मोठ्या वाङ्मयीन अपेक्षा न ठेवता ' चटकदार रसाळ गोष्टी ' या अपेक्षेने या कथासंग्रहा-कडे पाहिले तर तो आवडण्यासारखा आहे. दर्यावर्दी कोळयांच्या अपरिचित जीवना-विषयी कुतूहल बाळगणाऱ्या पांढरपेशा शहरी वाचकांना तो आवडेलही. ●

[ ' पागेर ' : शां. पां. कणेकर : प्रकाशक : आचार्य दत्ता कणेकर : मूल्य रु. ४ : पृष्ठे ८८ ]

## ☐ अक्कल-हुशारीने निवडलेले आई-बाप

विनोदी वाङमयात चरित्राची गणना करता येईल की नाही? माझे चरित्र कोणी लिहिले तर निश्चित होईल. इतकी तुफान विनोदी कपोल-कल्पित कथा वाचायला मिळणे नाही, हे पैजेवर सांगतो; अर्थात् माझे चरित्र लिहिले जाण्याची कधीच धास्ती नाही हा प्रश्न वेगळा! – पण मी म्हणतो का लिहिले जाऊ नये माझे चरित्र? चरित्र लिहायला माणूस कार्याने काय, पण वयानेही मोठा असावा लागतो असे दिसत नाही. आता हेच बघा–इंग्लंडचा अठरा वर्षांचा युवराज चार्ल्स याचे चरित्र सत्तरीला पोचलेले एक गृहस्थ लिहीत आहेत, असे परवा वाचले. तुम्ही यावर एक-दोन फालतू प्रश्न विचाराल याची मला पूर्ण कल्पना आहे, पहिला म्हणजे राजाचा उपयोग शोभेची वस्तू म्हणून करणाऱ्या लोकशाही इंग्लंडच्या या युवराजाने अक्कल-हुशारीने आई-बाप निवडण्याखेरीज चरित्र लिहिण्याजोगे आणखी काय केले? दुसरे म्हणजे ज्ञानेश्वरांनादेखील आपल्या जीवनाची सांगता करायला २१ वर्षे लागली. तेव्हा युवराज चार्ल्सच्या जीवनाची इतिकर्तव्यता अठराव्या वर्षीच झाली का?

पण या चांभारचौकशा सोडा. महत्त्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे निशारमल्हे चरित्रकाराने म्हणजे युवराज चार्ल्सच्या सहाव्या वर्षापर्यंतच्या जीवनाचे बारकाईने संशोधन करून लेखन केले आहे; पण सातव्या वर्षाचे संशोधन नीट जमले नसल्याने गाडी अडली आहे. अरेरे! जगाच्या चरित्र-वाङमयात पडू पाहणारी एक बहुमोल भर संशोधनासारख्या फालतू कारणावरून अशी अडकून पडावी ना? मला तर वाटले होते की चार्ल्स बाळाच्या पहिल्यावहिल्या टाहोचे टेपरेकॉर्ड ज्याप्रमाणे चरित्रकाराने लक्षपूर्वक ऐकले असणार, त्याप्रमाणे वयाच्या सातव्या वर्षाची बखरही राजवाड्यांच्या जिद्दीने पालथी घातली असणार.

काय बरे जागतिक महत्त्वाच्या गोष्टी सात वर्षांच्या चार्ल्सने करून दाखविल्या असाव्यात? कदाचित् त्याने दुधाच्या पेल्याला रामराम ठोकून (– सॉरी, गुडबाय करून) बियरचा पेला हातात घेतला असावा. हा मानसिक समरप्रसंग, "पहिला एकच प्याला" नावाच्या प्रकरणात चांगलाच रंगू शकेल. कदाचित् त्या वर्षात

त्याची शाळेत पहिली मारामारी झाली असेल व त्याच्या गुडघ्याला खरचटले असेल. मग काय, प्रकरण तयार– "आणीबाणीचा प्रसंग" कदाचित् त्या वर्षी तो आयुष्यातली पहिली कॉपी करून पास झाला असेल! प्रकरणाचे नाव?– अर्थात् "सत्यमेव जमते."

## ☐ निढळाच्या घामाचे डॉलर

आजच्या यंत्रयुगात बहुतेक सगळी कामे बटन दाबून करता येतात, तेव्हा निढळाचा घाम गाळून पैसे कमावण्याचे दिवस गेले, असे मी समजत होतो. पण नाही. घामात जे सूक्ष्म जंतू असतात, त्यांच्यापासून अंतरिक्ष-प्रवासाला जाणाऱ्या मंडळींना काही धोका आहे किंवा काय, याचे संशोधन सध्या अमेरिकेत चालू आहे व त्यासाठी संशोधन शास्त्रज्ञ काही मंडळींना अक्षरश: घाम गाळायला लावून तो घाम विकत घेत आहेत व घामट वास लपविण्यासाठी जी सुगंधी द्रव्ये वापरली जातात त्यांच्या किंमतीच्या शंभरपट किंमत त्या कामासाठी देत आहेत. आता बोला! हिंदुस्थानचा परदेशी चलनाचा प्रश्न चुटकीसरसा सुटल्यासारखा आहे की नाही? या शास्त्रज्ञ मंडळींना त्यांच्या संशोधनासाठी येत्या उन्हाळ्यात इकडे बोलवावे, म्हणजे हातपाय न हलवता घाम गाळण्याचे काम करायला एकेक हिंदुस्थानी माणूस दहा-दहा अमेरिकनांच्या जोडीचा आहे, हे त्यांना दिसेल, आपल्याला (घामाच्या) पाण्यासारखा पैसा मिळेल व शास्त्रज्ञांना मुबलक जंतू मिळतील. म्हणून म्हणतो, आराम हराम है, काम पण हराम है, फक्त घामात राम है.

## ☐ उसन्या बाळा जोजोरे

आपले लोक फारच गैरशिस्त अशी मी आतापर्यंत नेहमी तकार करीत आलो. पण यापुढे करणार नाही; कारण आपल्या लोकांत किती कडक शिस्त बाणली आहे याचे एक नेत्रदीपक व हृदय हेलावक उदाहरण नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत दिसले. मतदान करताना शिस्त पाळण्यासाठी मतदारांना ओळीत ताटकळून उभे राहावे लागते, पण कडेवर मूल असलेल्या स्त्रियांना पुढे जाऊ देण्यात येते, असे दिसल्यावर दक्षिण हिंदुस्थानात म्हणजे काही ठिकाणी काही शिस्तप्रिय स्त्रियांनी उसनी मुले आणून कार्यभाग साधला. याला म्हणतात कल्पक शिस्तपालन! उसना नवरा माहीत असलेल्या महाराष्ट्रात उसन्या बाळाची ही प्रेमळ कल्पना का बरे निघाली नाही? वेळ फुकट न जाऊ देण्याचा स्वार्थ अन् शिस्तबद्ध मतदानाचा परमार्थ एकाच वेळी साधण्याची ही क्लृप्ती खरे म्हणजे बुद्धिमान् (की बुद्धिमती?) महाराष्ट्रालाच साजेशी आहे.

●

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



## श्री. गो. जोशी
### सायनाचार्य, नासिक
### माहे एप्रिल भविष्य

**मेष** : एप्रिल महिना सुरू होताच तुमच्या डोक्यावरचे फार मोठे ओझे उतरल्यासारखे वाटेल. मनाला प्रसन्नत व स्वस्थता जाणवू लागेल. याही महिन्यात ग्रहमान संपूर्ण अनुकूल नाहीच; तरीसुद्धा तुम्ही तुमच्या कार्यक्षेत्रात धवघवीत यश संपादन करू शकाल. एवढे मात्र खरे की, या यशात सिंहाचा वाटा तुमच्या अविश्रांत परिश्रमाचा आहे.

दुसऱ्या पंधरवड्याचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल. शैक्षणिक यश लाभल, औद्योगिक प्रगती घडेल, वैचारिक संघर्ष मिटेल आणि राजकीय क्षेत्रात तात्त्विक विजय मिळल.

यंत्रतंत्रविशारदांना तर हा महिना महान पवणीसारखा वाटेल. दूरदूरचे प्रवास घडतील, काही भाग्यवानांना परदेशी जाण्याची संधीही लाभेल. दि. २ ते ८, १७ ते २१, २८ ते ३० या काळी अनंत प्रगत घटना भराभर घडून याव्यात.

**वृषभ** : अंतरिक्षातील ग्रह तुमच्यावर बेहद्द खूष आहेत. या वेळी जे जे भव्य आणि आकर्षक त्याचीच ओळख तुम्हांला होईल. ७ एप्रिलच्या शुक्र-हर्षल त्रिकोणापासून असे यशस्वी दिवस तुम्हांला लाभतील की, नवा अनुभव घेण्याची, अपरिचित क्षितिजे धुंडाळण्याची संधी चालून येईल. या संधीचा त्वरित लाभ उठविलात तर तुमचे जीवन

उजळून निघेल.

सामाजिक क्षेत्रात, राजकीय वातावरणात, कलेच्या प्रांतात विशेष प्रतिष्ठेचे स्थान लाभेल. कित्येक वर्षांनी लाभणारी ही अपेक्षासाफल्याची ग्रहस्थिती जे जे हवे ते ते तुम्हांला देऊन जाईल. सतत प्रयत्नशील राहायला हवे.

दि. २ ते ११, १५ ते १९, २२ ते २५ सर्व काल अनपेक्षितपणे प्रगतीला पोषक ठरेल.

**मिथुन** : या वेळी अनेक समय ग्रह तुमच्या दशमस्थानातून लाभस्थानाकड जात आहेत. काही गेलेलेही आहेत. तुमच्या यशस्वी जीवनाचे न सुटणारे गणित ते झटपट सोडवतील. प्रकृतीचे अस्वास्थ्य, पशाअडक्याची विवंचना दूर होईलच; शिवाय राजकीय क्षेत्रातील उच्चस्थानी विराजमान होण्याची संधीही लाभेल. दि. ७ ते १३ हाच आपल्या प्रगतीचा केंद्रबिंदू ठरेल.

सारा विरोध मोडून काढाल, फारसे परिश्रम न करताही अनपेक्षित लाभाचे धनी व्हाल. स्थावराचा प्रश्न यशस्वीपणाने सुटेल. वाहनाचा योगही लाभेल. थोरांचे, सपन्न व्यक्तींचे सहकार्य लाभेल. तात्पर्य, हा महिना आपणांस अनक दृष्टींनी संस्मरणीय ठरेल.

दि. ५ ते १२, १७ ते २१, २८ ते ३० विशेष महत्त्वाच्या गोष्टी या काली घडून याव्यात.

**कर्क** : तुमची कित्येक दिवसांची स्थगित कामे या महिन्यातही गती घेतील असे निश्चितपणे सांगता येणार नाही. मंगळ चतुर्थातच असल्यामुळे त्याच विवंचना-त्याच अडचणी.

या महिन्यात प्रवास धावपळ मात्र खूपच वाढेल. दि. १५ रोजी रवि-मंगळ प्रतियोग असल्यामुळे प्रवास फार जपून करा. कोणत्या क्षणी वाहन धोका देईल ते सांगताच येणार नाही. प्रवासाचा हेतूही सफल होण्याची शक्यता कमीच.

दुसऱ्या पंधरवड्यात मात्र आपले बरेचसे प्रश्न सुटायला लागतील. नोकरी-धंद्यासाठी केलेले प्रयत्न एप्रिलअखेरच्या आठवड्यात यशस्वी व्हावेत.

दि. ३ ते १०, १९ ते २५, २९–३० या काली आपले परिश्रम कारणी लागतील.

**सिंह** : सूर्य हे तुमचे आराध्य दैवत. ते या महिन्यात तुमच्या भाग्यस्थानी प्रकट-णार आहे. असा महान् पर्वकाल वर्षातून फक्त एकदाच येत असतो आणि अशाच वेळी आपल्या चारित्र्याला प्रचंड उत्थान देणाऱ्या घटना घडून यायला लागतात. या माझ्या विधानाची प्रचीती दुसऱ्या पंधरवड्यात आल्याशिवाय राहणार नाही. शिवाय पराक्रमस्थ मंगळाची आपणांस साथ आहेच.

तुमच्या कर्तृत्वाला दाही दिशा मोकळ्या दिसायला लागतील. काहीही करा, कुठेही जा, तुमचे सत्कार घडू लागतील. याच वेळी आपणांस नवे कार्यक्षेत्र सापडेल आणि तिथेच भावी प्रगतीचा पाया घातला जाईल. दूरचा प्रवासही घडेल.

दि. २ ते ७, १२ ते १५, १७ ते २३ या काळी नावीन्यपूर्ण प्रगतीच्या घटना घडू लागतील.

**कन्या :** एकटचा गुरुशिवाय अन्य साऱ्या ग्रहांची सहानुभूती आपण गमावून बसला आहात. अर्थात त्याचा परिणाम जो व्हायचा तो होणारच. त्याला उपाय नाही.

दुसऱ्या पंधरवड्यात अनेक ग्रह अष्टमस्थानी प्रवेश करणार असल्यामुळे प्रकृतीच्या तक्रारींना ऊत येईल. पैशाअडक्याच्या विवंचनाही तीव्रतेने जाणवायला लागतील. इष्टमित्र, शेजारीपाजारी तुमच्यावर नाराज बनतील. या सर्वांचा अतिरेक होऊ नये एवढी खबरदारी मात्र गुरू सतत घेत राहील. तो प्रतिष्ठेला धक्का लागू देणार नाही, की समाजात कुठेही अवहेलना होऊ देणार नाही. नव्या व्यवसायाला आरंभ करण्यास हे दिवस अनुकूल नाहीत.

दि. ३ ते ७, १३ ते १९ एवढेच दिवस काहीसे अनुकूल जाणवतील.

**तूळ :** राशिचक्राच्या केंद्रस्थानी तुमची राशी असल्यामुळे, वैचारिक समतोलपण, हा तुमचा जन्मजात गुणधर्म सध्याच्या संघर्षात्मक कालातसुद्धा प्रकर्षाने प्रकटेल. सूर्य-मंगळ युती योगासारखा स्फोटक योग ( दि. १५ ) या वेळी होणार आहे. अशा आणीबाणीच्या प्रसंगीही तुम्ही आपल्या मनाचा तोल ढळू देणार नाही यातच तुमच्या नीति-धैर्याचे दर्शन घडते.

हा सारा महिना आपणांस खूपच ताणाचा, अस्वास्थ्य वाढवणारा जाणवेल. वरिष्ठांशी, नोकरा-चाकरांशी मतभेद वाढू लागतील. कौटुंबिक वातावरण अस्वस्थ बनेल. कदाचित यांत्रिक बिघाड, स्फोट, धोके, असेही काही प्रसंग अचानक जाणवायला लागतील.

दि. ५ ते १०, १७ ते २१, २५ ते २९ हे दिवस यशस्वी व लाभदायक ठरावेत.

**वृश्चिक :** तुमच्या राशीचा व्ययस्थानचा मंगळ वक्रगतीने एकदशस्थानी प्रवेश करणार आहे. या बदलत्या अवस्थेने आपल्या परिस्थितीत फार मोठा फरक पडेल असे नाही; पण दगडापेक्षा वीट बरी इतकेच ! या महिन्यातही सांपत्तिक पेचप्रसंग, शत्रुत्व, मतभेद इत्यादी प्रसंगांना आपणांस निर्धाराने तोंड द्यावे लागणारच आहे. यातूनही नववा गुरू तुम्हांला यशस्वी करील, असा मला विश्वास वाटतो.

स्थानांतर, परदेशगमन, वैज्ञानिक संशोधन इत्यादी प्रकारच्या अनुकूल घटना एप्रिलच्या दुसऱ्या पंधरवड्यात घडून याव्यात.

दि. ३ ते १०, १७ ते २६ या कालातील तुमचे परिश्रम अपेक्षेबाहेर यशदायी ठरावेत.

**धनू :** या महिन्यातील सूर्य-मंगळांच्या राश्यंतरामुळे तुमच्या अंगीकृत व्यवसायात नवा अध्याय लिहिला जाईल. दुसऱ्या पंधरवड्यात या साऱ्या महत्त्वपूर्ण गोष्टी घडून याव्यात. चौथ्या शनीने रोखलेला प्रगतीचा मार्ग या महिन्यातच

मोकळा होईल. स्थावराचा चिघळलेला प्रश्न सुटेल, व्यवहारधंद्याचे बदललेले तंत्र–मंत्र अधिक लाभप्रद जाणवेल. आपल्याला लाभणाऱ्या अधिकाराच्या स्थानाबद्दलची भवती न भवती याच महिन्यात संपुष्टात येईल.

प्रकृतीच्या तक्रारी पूर्वीइतक्या तीव्र स्वरूप धारण करणार नाहीत. अधिकारी फार काळ नाराज राहणार नाहीत. या महिन्याच्या उत्तरार्धात नव्या आशा अंकुरायला लागतील.

दि. ५ ते ११, १९ ते २६ या कालात अनेक प्रगत घटना घडाव्यात.

**मकर** : या महिन्यात मंगळासारखा अचाट सामर्थ्याचा ग्रह पुनश्च भाग्यात येणार आहे. (दि. १९) त्याचे हे अवचित येणे तुम्हांला अधिक उत्साहाचे–प्रगतीचे जाणवल्याशिवाय राहणार नाही.

दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल, नवे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप धावपळ करावी लागेल. हुकलेली लाभाची संधी पुन्हा तुमच्यापुढे उभी राहील, व्यावसायिक वातावरण प्रसन्न दिसू लागेल.

फक्त १५ एप्रिलच्या आसपासचा काल काहीसा जपून काढा म्हणजे झाले. स्थावराच्या विवंचना कायमच्या मिटतील, दाही दिशांनी तुमची प्रगती स्वैरसंचार करू लागेल.

दि. ३ ते १०, १७ ते २१, २५ ते २८ या काळी अनेक समस्या सुटू लागतील.

**कुंभ** : वक्रगतीने मंगळाची स्वारी पुन्हा अष्टमस्थानी येणार आहे याची खंत बाळगू नका. अनेक ग्रह तुमच्या पराक्रमस्थानी एप्रिलच्या दुसऱ्या पंधरवड्यात येणार असल्यामुळे, त्यांचे साहाय्य घेऊन आपण विक्रमी यश संपादू शकाल.

एप्रिल महिन्यात आपली आर्थिक विवंचना मिटेल, नोकरीधंद्यांत घवघवीत यश लाभेल, सामाजिक प्रतिष्ठा अपेक्षेबाहेर उंचावेल.

दुसऱ्या पंधरवड्यात आपण नवा प्रांत काबीज करू शकाल, व्यवहारधंद्याचे नवे आणि प्रभावी तंत्रमंत्र जगाला शिकवू शकाल.

दि. १ ते ७, १० ते १३, १७ ते २१ या काली अपेक्षेबाहेर यश लाभावे.

**मीन** : या महिन्यातील सूर्य–मंगळांची राश्यंतरे आपणांस फारशी आशादायक ठरतील असे दिसत नाही. त्याच अडचणी. त्याच विवंचना. थोडाफार फरक तपशीलात.

पहिल्या पंधरवड्यात शारीरिक, मानसिक ताण वाढेल तर दुसऱ्या पंधरवड्यात कौटुंबिक क्लेश आणि सांपत्तिक पेच निर्माण व्हायला लागतील. मुख्यत: दि. १५ च्या आसपास अनेक खडतर त्रासांना तोंड द्यावे लागेल. गुरुच्या सहकार्यामुळे एवढेच घडेल की, मोठ्या प्रयासाने वेळ निभावून जाईल.

दि. ३ ते १०, १८ ते २१, २६ ते २९ या काली परिश्रमाचे यश लाभेल. ●

# उर्दू वार्ता

संकलन : हिदायतखान

## □ मोरारजींचे प्रतिबिंब

वॉशिंग्टन येथे एका पत्रकार परिषदेत बोलताना अमेरिकेच्या सरकारी प्रवक्त्यानं श्रीमती इंदिरा गांधींची पंतप्रधानपदी निवड झाल्याचे स्वागत करून म्हटले, "भारत आपली पूर्वीचीच धोरणे चालू ठेवील असा आम्हांस विश्वास वाटतो. जागतिक शांतता, अन्नधान्याबाबत भारत पूर्वीप्रमाणेच कार्यरत राहील, अशी आशा आहे."

यंदाच्या निवडणुकीत अमेरिकेच्या अनेक 'हस्तकांचा' पराभव झाल्याबद्दल तिला साहजिकच खंत वाटत असली तरी ती काँग्रेसच्या भविष्यातील यशाविषयी आशावादी आहे.

इंदिरा मंत्रिमंडळातील श्री. मोरारजी देसाई यांच्या समावेशाबाबत उपरोक्त प्रवक्त्यानं म्हटलं, "सरकारी धोरणावर-निर्णयावर भविष्यात मोरारजींच्या मतांचे प्रतिबिंब पडल्याशिवाय राहणार नाही! देशांतर्गत शांतता, सुव्यवस्था व पाकिस्तान-संबंधीची धोरणे निश्चितच आता अधिक कडक बनतील!"

मोरारजी पूर्वी अमेरिकेचे समर्थकच होते; परंतु गेल्या काही वर्षांपासून ते विरोधक बनले आहेत. १९४२ साली अवमूल्यन, काश्मीर प्रश्न इत्यादींबाबत त्यांनी कसून विरोध केला होता!

'इन्कलाब' (मुंबई) १५-३-६७

## □ कम्युनिझम हाच धर्म!

चीनमध्ये सर्व धर्मीयांची पद्धतशीर पायमल्ली चालू असून फक्त कम्युनिझम हाच एकमेवाद्वितीय धर्म असल्याचे तेथील जनतेच्या मनावर बिंबवण्याचा खटाटोप सुरू आहे. मुस्लिमांच्या इस्लाम धर्माला तर तिथे सुरूंगच लावण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. वस्तुतः कम्युनिस्ट राष्ट्र असलेल्या रशियाने मुस्लिमांशी जुळते घेण्याचे ठरविले आहे; परंतु चीनला ते प्रतिगामीपणाचे लक्षण वाटते!

नव्या 'सांस्कृतिक क्रांतीच्या' मनूमध्ये फक्त एकच 'कलमा' आहे—माओ! माओ हाच देव, कम्युनिझम हीच संस्कृती आणि माओच्या आदेशांचे पालन हीच नागरिकांची कर्तव्ये!...

ऊठसूट इस्लाम धर्माचा उदो उदो करणाऱ्या प्रे. अयुबमियांना हे सारे दिसत नाही, की दिसत असूनही ते जाणूनबुजून त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत?

'कारवाने वतन' (दिल्ली) ८-३-६७ ●

# ग ब न

- नावीन्यपूर्ण कथा
- संयमपूर्ण मांडणी
- सामान्य दिग्दर्शन

मुनशी प्रेमचंदांच्या कादंबरीवर आधारित 'गबन' चित्रपट विषयाचे वेगळेपण आणि सीधी व कलात्मक मांडणी यांमुळे एकदम लक्ष वेधून घेतो. प्रेमचंदांच्या कादंबरीवाङ्मयात गबनला अग्रस्थान नसले तरी कथाविषय व त्याला दिलेली कलाटणी विलक्षण आहे. सामान्य माणूस आपल्या जीवनाची दिशा निश्चित करू शकत नाही तर त्याच्याभोवतीची परिस्थिती त्याचा जीवनमार्ग, त्यावरील घटना ठरवीत असते हे मोठ्या वेधक तऱ्हेने प्रेमचंदांनी सांगितले आहे व ही वेधकता चित्रपटातही आहे.

## 'गबन'ची कथा

अलाहाबाद नगरपालिकेत बिलकलेक्टरची नोकरी करणाऱ्या रमानाथाला खोट्या मोठेपणाखातर, झुटी प्रतिष्ठा दाखविण्यासाठी वल्हाणे करण्याची, खोटे बोलण्याची सवय असते. आणि ही सवयच त्याच्या बरबादीस कारण होते. या रमानाथचे लग्न होते. वडिलांच्या कोर्टातील हुद्यास साजेसे लग्न करावे लागल्याने फार खर्च होतो. उधारीवर घेतलेल्या दागिन्यांचे पैसे देणे जमत नाही. सराफ तर लकडा लावतो.

इकडे रमानाथाने तर आपल्या बायकोजवळ फुका बढाई मारलेली असते की, "माझे वडील असे श्रीमंत आहेत आणि त्यांच्या इतका बँक बॅलन्स आहे..." वगैरे. परिणाम व्हायचा तोच होतो. रमानाथाला आपल्या बायकोच्या नकळत सराफाला देण्यासाठी दागिन्यांची पेटी उचलून वडिलांजवळ परत करावी लागते. तो भासवितो मात्र असे की, पेटी चोरीलाच गेली. येथूनच त्याच्या जीवनातील दुष्टचक्रास सुरुवात होते. बायकोची दागिन्यांची हौस भागविण्यासाठी तो पैसे खाऊ लागतो. उधारी करतो, खोटे व्यवहार करतो. बायकोपासून मात्र हे सारे लपवितो. अशाच एका प्रसंगी शेवटी त्याला कचेरीत जमलेल्या रकमेतील मोठी उचल करावी लागते. ठरल्या वेळी त्याला पैसे परत देता येत नाहीत. आपली अफरातफर उघडकीस येणार, पोलिस आपल्याला पकडणार, घराची बदनामी होणार आदी गोष्टींना घाबरून तो घरातून पळून जातो.

येथे कथेस मोठी सुरेख कलाटणी मिळते. गाडीमध्ये रमानाथाला एक सहृदय गृहस्थ भेटतो. रमानाथाजवळ तिकीट नसल्यावरून व त्याच्या चोरटेपणाच्या वागणुकीवरून तो ओळखतो की, हा तरुण पळून आला आहे म्हणून. पण त्याला कारण वेगळे वाटते. स्वातंत्र्ययुद्धाने भारावलेल्या त्या वेळच्या वातावरणात हा तरुणही आईबाप, बायकोला सोडून असेच काही तरी करण्यास निघाला आहे, अशी त्याची समजूत होते. तो रमानाथाला आपल्या घरी नेतो, तेथेच राहण्याची व्यवस्था करतो.

दुर्दैवाने रमानाथ एका स्वातंत्र्यमोर्चाच्या गडबडीत पोलिसांच्या हाती लागतो. रमानाथला वाटते अलाहाबाद–अफरातफरीच्या संदर्भातच ही अटक आहे. या गोष्टीचा पोलिस फायदा घेतात व एका बाँब-स्फोटाच्या खटल्यात त्याला खोटी साक्ष देण्यास लावतात. जीव बचावण्याच्या, घरी सुखरूप परतण्याच्या लालसेने तो तशी साक्ष देतोही. पण याचमुळे तो बायकोच्या व इतरांच्या नजरेतून खाली उतरतो.

साक्षीच्या बदल्यात पोलिसांनी देऊ केलेला मानमरातब, अमाप पैसा व चांगली नोकरी बायकोला तुच्छ वाटते व त्या सगळ्याचा ती तिटकारा करते; कारण रमानाथाने देशाशी बेइमानी केलेली असते. तेव्हा रमानाथला आपली चूक उमगते. वरच्या कोर्टातील अपिलाच्या वेळी तो पोलिसांची नजर चुकवून अचानक कोर्टात येतो व सगळी कहाणी सांगतो. पोलिसांनी आपल्यावर कसे दडपण आणले हे स्पष्ट करतो. बाँब खटल्यातील आरोपी सुटतात व रमानाथचे व पत्नीचे मीलन होते.

## चांगल्या प्रसंगांची गोदडी

रमानाथाच्या परिस्थितीच्या फेऱ्यात गुंतत जाण्याला मध्यंतरानंतर सुरुवात होते; तेव्हापासून चित्रपट अतिशय वेधक झाला आहे. प्रेमचंदांच्याच 'गोदान' कादंबरीवरील किशन चोप्रांच्या 'हीरामोती 'ची 'गबन 'ला सर येत नाही किंवा चोप्रा यांच्याच 'चार दिवारी 'इतका हा चित्रपट वास्तवही वाटत नाही. 'गबन' अर्धवट असतानाच किशन चोप्रांचे निधन झाले व पुढे चित्रपटाचे दिग्दर्शन हृषिकेश मुकर्जी यांनी केले. या चित्रपटाची हाताळणी शक्य तितकी वास्तव करण्याचा प्रयत्न आहे. स्वातंत्र्यपूर्व काळचे वातावरण निर्माण करण्यात दिग्दर्शकांना बरेच यश आले आहे. तरी या चित्रपटाची धंद्याशी तडजोड सुटली नाही. विशेषत: सुनील दत्त यांचे बागेमध्ये जाऊन गाणे-नाचणे सबंध चित्रपटाच्या वातावरणाशी एकदम विसंगत वाटते. या चित्रपटात खटकणारा आणखी एक दोष म्हणजे चित्रपटात सलगता आलेली नाही. बऱ्याच वेळा कादंबरीतले चांगले भाग उचलून त्यांचे चित्रण दाखवावे असे तुटक, तुटक प्रसंग वाटतात.

चित्रपटाची सुरुवात रटाळच होते; पण पुढे एकदम तो नाट्यमय बनतो व रस वाटू लागतो. मध्यंतरानंतरचा चित्रपट तर अगदी स्वच्छ आहे. रमानाथाच्या जीवनात पुढे घडणाऱ्या घटनांना कारण होणारी त्याची कृत्ये किंवा सुरुवातीच्या

काळातील त्याची बहाणे करण्याची वृत्ती दाखविण्यासाठी निवडलेल्या घटना प्रभावी नाहीत. त्यामुळे लग्नाच्या पहिल्या रात्रीच जेव्हा रमानाथ बायकोजवळ बाता ठोकू लागतो, तेव्हा त्याचा अर्थच कळत नाही. त्याची लपवाछपवी कशासाठी असते हेच समजत नाही. शेवटी कोर्टात तो स्वतःची कहाणी सांगतो तेव्हा या गोष्टींचा अर्थ लावायचा. तीच गोष्ट त्याची पत्नी जलपा हिच्या व्यक्तिरेखेची. सुरुवातीच्या काही प्रसंगी ती दागिन्यांसाठी विलक्षण वेडी दाखविली आहे तर काही प्रसंगी ती अती समजूतदारपणाची वाक्ये बोलून जाते. पात्रांचा व कथेचा परिपोष नीट होत गेलेला नाही. हा दोष किशन चोप्रांच्या सहकार्याने बनलेल्या पटकथचा असू शकेल.

रमानाथ म्हणून सुनील दत्तने बरेच प्रभावी काम केले आहे. भूमिका जिवंत करण्यासाठी त्याने फार परिश्रम घेतले आहेत. त्याच्या पत्नीच्या भूमिकेतील साधना 'परख 'मधील तिच्या भूमिकेची आठवण देते; पण येथे तिला फारसा वाव नाही. कन्हैयालाल व लीला मिश्रा यांची कामे उत्तम झाली आहेत.

विषयाला साजेसे के. वैकुंठ यांचे छायाचित्रण आहे. कोठेही प्रकाशाचा भग-भगीतपणा किंवा भडकपणा जाणवत नाही. यामुळे चित्रपटाची वास्तवता वाढण्यास मदत झाली आहे.

शंकर-जयकिशन यांनी गाण्यांना दिलेल्या चाली चांगल्या असल्या तरी त्या देण्याच्या व वाद्यांच्या आहारी ते फार गेले आहेत. त्यामुळे सुरेल चालीचे गाणे कडवे संपताच वाद्यांच्या गोंधळात एकदम बदसूर वाटू लागते. पार्श्वसंगीत मात्र झकास जमले आहे. सुनील दत्तच्या भावनांचे कल्लोळ दाखविणारे बरेच पीसेस कायम लक्षात राहावेत असे आहेत.

गबनसारखा हिंदी चित्रपट पाहण्याची वेळ केव्हातरी, कधी तरी एकदा येते. त्यात दोष आहेत, हवी ती उंची या चित्रपटास नाही. तरी कलेशी इमान राख-ण्याचा प्रामाणिक प्रयत्न म्हणून त्याचे स्वागत व्हायला हवे. ★

## फुले किंवा मुले ?

फुले आणि मुले यांची सांगड घालणे हा आपल्याकडे सर्वमान्य संकेत आहे. पण केरळमध्ये एक फूल आहे त्याचा उपयोग म्हणे संततिप्रतिबंधक औषध म्हणून करता येतो. भले शाबास ! म्हणजे महाराष्ट्रात 'फुले आणि मुले' असली तरी केरळात 'फुले किंवा मुले' म्हणायला हवे ! आता एखाद्या इष्टपुत्रा सौभाग्यवतीला " (कु) लूपवती भव " असा आशीर्वाद द्यायला नको. या फुलांचा गजरा तिने अंबाड्यावर माळला की पुष्पधन्वा मदनाने केलेला घोटाळा या फुलाच्या मदतीने निस्तरता येईल

# डो रि स डे

त्या दहा वर्षांच्या मुलीने हॉलमध्ये सर्वत्र नजर टाकली. हॉल प्रेक्षकांनी गच्च भरला होता. पाय ठेवायलाही जागा नव्हती. साऱ्यांच्या नजरा रंगमंचाकडे लागल्या होत्या. पडदा केव्हा वर जातो, याची प्रेक्षक मोठ्या उत्सुकतेने, अधीरतेने वाट पाहत होते. त्या दहा वर्षांच्या बालिकेच्या मनात विचारांच्या लाटा उसळत होत्या. ती काहीशी घाबरली होती, बावरली होती; परंतु उत्साह तिच्या नसानसांत खेळत होता. आपली स्वप्ने ती रंगवीत होती, महत्त्वाकांक्षा आठवीत होती.

पुन्हा गडगडाट झाला. " नाच...नाच...नाच... !" या वेळी आवाजात कठोरपणा होता. एक क्षण, फक्त एकच क्षण ती निश्चल उभी राहिली. तोच पडदा वर गेला आणि दुसऱ्याच क्षणी तिने नृत्य करण्यास सुरुवात केली. प्रेक्षक श्वास रोखून त्या बालिकेचा पदन्यास पाहू लागले. पाच मिनिटे गेली...दहा मिनिटे गेली... ती बालिका आपल्या चपल पदन्यासाने मिनिटा-मिनिटाला प्रेक्षकांना अधिकाधिक रिझवीत होती. प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले होते. मूर्तिवत् बसून तिचा नृत्य झंकार पाहत होते...आणि काही वेळाने नृत्य संपले. टाळ्यांचा एकच कडकडाट झाला. " वन्स मोअर ", " वंडरफुल ", अशा आरोळ्यांनी हॉल दुमदुमून गेला.

पडदा पडला होता, पण ती बालिका मात्र रंगमंचावरच उभी होती. प्रेक्षकांनी उधळलेल्या स्तुतिसुमनांमुळे ती आनंदाने गालातल्या गालांत हसत होती. आपल्या परिश्रमाच्या मिळालेल्या पावतीमुळे ती सुखावली होती. तिला वाटले, पुन्हा आपण असेच नाचावे नि प्रेक्षकांनी पुन्हा पुकारा करावा –" वन्स मोअर ", " हाऊ लव्हली."

ही मुलगी होती – डोरिस डे !

सिनसिनाटी या गावी विल्यम कॅपलहॉफ व डोरिस केन्यॉन यांच्या पोटी डोरिस कॅपल्हॉफ जन्माला आली. ३ एप्रिल ही तिची जन्मतारीख. तिचे वडील प्रख्यात ऑर्गनवादक असून ते पियानो, व्हायोलिन व गायन शिकवीत असत; परंतु डोरिसचा कल नृत्याकडे होता. नृत्याचे धडे तिने आपल्या घरीच गिरविले. त्यात तिने कमालीची प्रगती केली. वयाच्या बाराव्या वर्षी ती कॅन्चन व मार्को या प्रसिद्ध थिएटरमध्ये होणाऱ्या नृत्यांच्या कार्यक्रमांत भाग घेऊ लागली.

## नृत्यकलेला रामराम

नृत्याच्या कार्यक्रमात ती दंग असतानाच तिला दुर्दैवाचा पहिला झटका बसला. एकदा एका मोटारमध्ये बसून ती दौऱ्यावर निघाली असता ओहिओमधील हॅमिल्टन या गावी त्या मोटारीला अपघात झाला. त्यामुळे डोरिस चांगलीच जायबंदी झाली.

तिला खूप जखमा झाल्या. चौदा महिने तिला त्यांवर उपचार करून घ्यावे लागले. मात्र पाय कमजोर झाल्याने पुन्हा नृत्य करण्यास तिला मनाई करण्यात आली. तिला जबरदस्त धक्का बसला. ती निराश झाली. तिला गतकालच्या गोष्टी आठवू लागल्या. प्रेक्षकांच्या आरोळ्या तिच्या कानांत घुमू लागल्या. स्मृतींचा चित्रपट तिच्या नजरेसमोर सरकू लागला. पण काही काळच . . . ! नंतर तिने स्वतःला सावरले. ती नृत्य करू शकणार नव्हती; पण गाणे गाऊ शकत होती. ही कल्पना मनात येताच ती उठली नि तडक ग्रेस रेन या गायनशिक्षिकेकडे गेली. तिच्याकडे डोरिसने आवाजातील चढउतार व गायन-कलेतील बारकावे यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास केला. गायनाचे तर बाळकडूच तिला मिळाले होते. हवा होता तो फक्त सराव. दिवसेंदिवस तिने खूप सराव करून गायनात चांगलीच प्रगती केली.

सिनसिनाटी शहरातील एका प्रख्यात नाईट क्लबचा मालक व बॅन्ड-प्रमुख बार्ने रॅप याने डोरिसला आठवड्याला २५ डॉलर्स देण्याचे कबूल केले व आपल्या क्लबमध्ये तिला गायिका म्हणून ठेवून घेतले. तिची प्रगती पाहून तो खूप खूष झाला. तिचे डोरिस कॅपल्हॉफ हे नाव मात्र त्याला जरा बोजड वाटले. दिवसेंदिवस तिची होत असलेली प्रगती पाहून (Day by day) रॅपने तिचे ' डोरिस डे ' असे सुटसुटीत नामकरण केले. पुढे तिला बॉब क्रॉस्बी व फ्रेड व्रॉरिंग यांच्या बॅन्डमध्ये काम मिळाले. त्यानंतर तीन वर्षे तिने लेस ब्राऊन यांच्याबरोबर काम केले. त्या दोघांच्या " सेटलमेन्ट जर्नी " या ध्वनिमुद्रिकेने उत्पन्नाचा उच्चांक गाठला. डोरिस डे कलाक्षेत्रात यश संपादन करीत होती; परंतु खासगी आयुष्यात मात्र तिला यश लाभले नव्हते. तिला दुसऱ्यांदा घटस्फोट घ्यावा लागला होता.

## चित्रपट-प्रवेश

दुसऱ्या घटस्फोटानंतर म्हणजे १९४७ च्या सुमारास लिट्ल क्लब, न्यूयॉर्क येथील कार्यक्रमांचे वेळी डोरिसचा एजंट अल्‌लेव्ही याने वॉर्नर ब्रदर्स या चित्रपट संस्थेशी संधान बांधले. दिग्दर्शक मायकेल कर्टिझशी डोरिसची भेट घालून देण्यात आली. त्या वेळी कर्टिझ " इट इज् मॅजिक " हा संगीतप्रधान चित्रपट निर्माण करीत होते. त्यांनी डोरिसला सांगितले, " माझ्याकरिता काही गा ! " डोरिसने " दॅट ओल्ड ब्लॅक मॅजिक " या गाण्याला सुरुवात केली. परंतु दुसऱ्या ओळीच्या वेळीच तिला रडू कोसळले. तिने दुसरे गाणे गाण्याचा प्रयत्न केला, परंतु ती गाऊ शकली नाही. अल्‌लेव्ही उद्‌गारला, " डोरिस अभिनयही करू शकत नाही. आयुष्यात तिने केव्हाही अभिनय केला नाही. " त्याच्या या स्पष्टवक्तेपणाचे कर्टिझना कौतुक वाटले. मात्र डोरिसने त्यांच्यावर तशाही परिस्थितीत छाप पाडली. त्यांनी तिला ' चाचणी 'करिता स्टुडिओत पाठवले नि तिसऱ्याच दिवशी तिने वॉर्नर ब्रदर्सशी करार केला. एका नव्या चित्रतारकेचा जन्म झाला.

" रोमान्स ऑन दि हाय सीज् " हा डोरिसचा पहिला चित्रपट. त्यानंतर तिने वॉर्नर ब्रदर्सच्या माय ड्रीम इज् युवर्स, इटस् ए ग्रेट फीलिंग, इत्यादी अनेक चित्रपटांत कामे केली.

१९५४ च्या सुमारास तिने वॉर्नर ब्रदर्स ही संस्था सोडण्याचा निर्णय घेतला; कारण वॉर्नर ब्रदर्सच्या चित्रपटांत तिला दुय्यम स्वरूपाच्या व ठराविक साच्याच्या भूमिका कराव्या लागत होत्या. त्याला ती कंटाळली होती. तिला मेट्रो-गोल्डविन-मेयर या संस्थेच्या " लव्ह मी ऑर लीव्ह मी " या चित्रपटात काम मिळाले. त्यानंतर लगेच आल्फ्रेड हिचकॉक यांच्या " दि मॅन हू न्यू टू मच " या गाजलेल्या चित्रपटात काम करण्याची तिला संधी मिळाली. या चित्रपटातील भूमिकेमुळे ती अधिक लोकप्रिय झाली. भावनाप्रधान भूमिका करण्यात ती कुशल असल्याचे साऱ्यांना पटले.

आपल्याला मिळालेल्या यशाने डोरिसचा आनंद द्विगुणित झाला. आपल्या वाढदिवसाच्या दिवशी म्हणजे ३ एप्रिल, १९५१ रोजी तिने मार्टीन मेल्चर यांच्याशी तिसरा विवाह केला. त्यांच्या सहकार्याने तिने स्वतःची आर्विन प्रॉडक्शन्स् नावाची चित्रपटसंस्था स्थापन केली व " ज्युली " नावाचा चित्रपटही निर्माण केला. " ज्युली " नंतर तिने पाजामा गेम, टीचर्स पेट, टनेल ऑफ लव्ह, पिलो टॉक, प्लीज् डोन्ट ईट दि डेसिस्, मिडनाईट लेस, लव्हर कम बॅक, डू नॉट डिस्टर्ब, दॅट टच ऑफ मिंक, जम्बो, दि थ्रिल ऑफ इट ऑल, मूव्ह ओव्हर डार्लिंग वगैरे चित्रपटांत भूमिका केल्या. त्यांतील बहुतेक सर्व चित्रपट गाजले. विनोदी अभिनेत्री म्हणून तिचा बोलबाला झाला.

मध्यंतरी तिला नाइलाजाने नृत्य करावे लागले. आपल्या व्यंगाची तिला कल्पना होती. आणि या नृत्यात तर जिन्यावरून उड्या माराव्या लागणार होत्या. ज्या वेळी तिने नृत्य करण्यास सुरुवात केली त्या वेळी बालपणाच्या आठवणी तिच्याभोवती पिंगा घालू लागल्या. त्या धुंदीतच ती नाचली आणि तिचे ते नृत्य बहारदार झाले. तिच्या पायांतील दोष नाहीसा झाला होता. तिला कमालीचा आनंद झाला.

१९४७ मध्ये चित्रपटक्षेत्रात आलेली डोरिस डे आज वीस वर्षांनंतरही प्रगतिपथावर आहे. तिच्या समकालीन चित्रतारका लुप्तप्राय झाल्या, स्मृतिआड गेल्या; तिच्यानंतरही अनेक चित्रतारका आल्या नि गेल्या. पण डोरिस डे मात्र आपली लोकप्रियता व आपले स्थान टिकवून आहे.

नावलौकिक, पैसा, प्रतिष्ठा सारे काही पायांशी लोळण घेत असूनही ती निगर्वी आहे. खूप काम करणे तिला आवडते आणि तेच तिच्या यशाचे कदाचित् रहस्य असावे. ●

आशोक आंग्रे

श्री. ब. मो. पुरंदरे

यांची एक ऐतिहासिक कादंबरी




# शिलंगणाचं सोनं

मूल्य तीन रुपये

राजहंस प्रकाशन पुणे

४१९ नारायण पेठ, पुणे २

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**